सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २७८ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. ९ डिसेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# वंदे मातरम्‌ला विरोध काँग्रेसच्या रक्तात : गृहमंत्री अमित शहा

## कुटुंबातील दोन्ही सदस्य लोकसभेत होते अनुपस्थित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९नवी दिल्ली**

राज्यसभेत वंदे मातरम या राष्ट्रीय गीतावर बोलताना गृहमंत्री अमित शहा म्हणाले की, ज्यांना वंदे मातरमचे महत्त्व समजत नाही ते ते निवडणुकांशी जोडत आहेत. एक दिवस आधी काँग्रेस नेत्या प्रियांका गांधी यांनी लोकसभेत विचारले की हे गाणे १५० वर्षांपासून देशाच्या आत्म्याचा भाग आहे. मग आज त्यावर चर्चा का होत आहे? मी तुम्हाला सांगतो: कारण बंगालच्या निवडणुका येत आहेत. मोदी त्यात भूमिका बजावू इच्छितात.

शहा यांनी त्यांच्या उत्तरात प्रियांका गांधींचा उल्लेख केला नसला तरी, ते म्हणाले



की बंकिमबाबू बंगालमधून आले होते हे खरे असले तरी, वंदे मातरम हा बंगालचा भागही नव्हता. आजही, जेव्हा एखादा सैनिक सीमेवर सर्वोच्च बलिदान देतो तेव्हा त्याच्या ओठांवर एकमेव मंत्र वंदे मातरम असतो, ते म्हणाले. 'वंदे मातरम' हा नारा स्वातंत्र्याच्या घोषणेचा नारा बनला. तो स्वातंत्र्यासाठी प्रेरणास्त्रोत बनला.

खरं तर, राष्ट्रगीत वंदे मातरम्ला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने भारत सरकारतर्फे वर्षभर चालणारा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. २ डिसेंबर रोजी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सर्व पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक बोलावली होती. यात ठरवण्यात आले होते की, वंदे मातरम्बाबत ८ डिसेंबर रोजी लोकसभेत आणि ९ डिसेंबर रोजी राज्यसभेत चर्चा होईल.

**खरगे यांनी विचारले, पंतप्रधान आणि गृहमंत्री फक्त नेहरूंनाच का लक्ष्य करतात?**

मल्लिकार्जुन खरगे म्हणाले, नेहरू, महात्मा गांधी, मौलाना आझाद, नेताजी सुभाषचंद्र बोस, सरदार पटेल आणि गोविंद वल्लभ पंत यांच्यासह काँग्रेस कार्यकारिणीने एकमताने एक ठराव मंजूर केला ज्यामध्ये शिफारस करण्यात आली की राष्ट्रीय कार्यक्रमांमध्ये जिथे जिथे वंदे मातरम गायले जाईल तिथे फक्त पहिले दोन श्लोकच गायले जावेत. काँग्रेस कार्यकारिणीत नेहरू एकटे होते का? तुम्ही सामूहिक निर्णय घेणाऱ्या सर्व वरिष्ठ नेत्यांचा अपमान करत आहात. पंतप्रधान आणि गृहमंत्री नेहरूंना का लक्ष्य करतात?

# अनावश्यक कागदपत्रांची संस्कृती संपवणार-पंतप्रधान मोदींचा संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९नवी दिल्ली**

संसद भवन ग्रंथालयात मंगळवारी एनडीए संसदीय दलाची बैठक पार पडली. बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएच्या विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. बैठकीत बोलताना पंतप्रधानांनी शासनव्यवस्थेतून अनावश्यक कागदपत्रे आणि ३०-४० पानांच्या फॉर्मांची संस्कृती पूर्णतः संपवण्याची गरज अधोरेखित केली. नागरिकांना वारंवार डेटा जमा करण्यास भाग पाडणारी यंत्रणा बदलली पाहिजे. सेवा नागरिकांच्या दारी पोहोचली पाहिजे, असे ते म्हणाले.

पंतप्रधानांनी नियम आणि कायदे सामान्य नागरिकांसाठी त्रासदायक नसावेत, जीवन सुलभ करणारे असावेत, यावर भर दिला. सुधारणा केवळ अर्थव्यवस्थेपुरत्या



मर्यादित न ठेवता समाजाच्या सर्वच क्षेत्रात व्हायला हव्यात, असेही त्यांनी स्पष्ट केले.

बैठकीत पंतप्रधानांनी दहाव्यांदा बिहारचे मुख्यमंत्री बनलेल्या नितीश कुमार यांचे कौतुक करत त्यांना 'बिहार विजयाचे शिल्पकार' संबोधले. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, अमित शाह, जे.पी. नड्डा, अश्विनी वैष्णव यांच्यासह एनडीएचे अनेक नेते बैठकीला उपस्थित होते.

मोदी यांनी सरकारने स्वयं-प्रमाणीकरणाला दिलेल्या प्रोत्साहनाचा उल्लेख केला आणि गेल्या दहा वर्षांत नागरिकांचा विश्वास अबाधित राहिल्याचे सांगितले. Ease of Life आणि Ease of Doing Business या दोन्ही गोष्टी सरकारच्या प्राथमिकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देश आता 'रिफॉर्म एक्सप्रेस' टप्प्यात असून सुधारणा जलद गतीने आणि नागरिक-केंद्रित पद्धतीने होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी पंतप्रधानांनी ११ डिसेंबर रोजी एनडीए खासदारांसाठी आयोजित स्नेहभोजनाची माहितीही दिली. या स्नेहभोजनात संसद अधिवेशनातील रणनीती, विधायी अजेंडा आणि आगामी पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम विधानसभा निवडणुकांची तयारी अशा मुद्द्यांवर चर्चा अपेक्षित आहे.

# गुटखा विक्रीप्रकरणी मकोका लावणार मुख्यमंत्री फडणवीस यांची विधानसभेत घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९नागपूर**

गुटखा ,मावा, सिगारेट, सुपारी, मान मसाला व चरस गांजाची विक्री प्रतिबंधीत असून्, आजही मोठ्या प्रमाणात गुटखाच्या माध्यमातून् ड्रग्जचीही विक्री होत आहे. याप्रकरणी कारवाई झाल्यावरही आरोपी मोकाट सुटतात. त्यामुळे यासंदर्भातील कायदे अधिक कडक केले जातील. तसेच, त्यात अधिक सुधारणा करून अशा प्रकरणी मकोका लावणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रश्नोत्तराच्या तासात दिली.



मुख्यमंत्री म्हणाले, महाराष्ट्र शासनाच्या गुटखा विक्रीस मनाई आदेश आहे. त्यानंतरही भारतीय न्याय संहितेच्या कलमानुसार विविध गुन्हे नोंदवून १७ लाख ४० हजार रूपयाचा गुटखा जप्त करण्यात आला. नवी मुंबईत ११४४, अहिल्यानगर १८५, जालना ९०, अकोला ३५, नाशिक १३१, चंद्रपूर २३०, सोलापूर १०८, बुलढाणा ६३४, नागपूर ४९, यवतमाळ १७०६ गुन्हे दाखल करण्यात आले. गुटखा विक्री थांबविण्यासाठी संयुक्त कारवाई पथकेही स्थापन करण्यात आली. अंमली पदार्थाच्या व्यापारावर आळा घालण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय नार्को कोऑर्डीनेशन सेंटर व जिल्हास्तरीय अंमली पदार्थ विरोधी कार्यकारी समिती अशा समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परीसरात व आजुबाजुच्या परीसरात दुकानांमध्ये नशाजन्य गोळया व चॉकलेट किंवा इतर काही खाद्यपदार्थाचे मुलांना विक्री होणार नाहीत, या अनुषंगाने नियमित पोलीसविभागामार्फत डमी ग्राहक पाठवून पडताळणी करण्यात येत आहे. असे असले तरी अशी विक्री सुरूच असल्याने त्यावर कठोर प्रतिबंध घालण्यासाठी कमकुवत कायदा अधिक कठोर व कडक करण्यासाठीचे निर्देश कायदा व विधी विभागाला सांगण्यात आले. मकोका लावतानाच त्यांच्यावर एनसीओसी करता येईल. यासोबतच अशा प्रकरणी दर्जेदार पुनर्वसन केंद्र तयार करण्याचेही प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

# मुंबई-ठाण्यातच नव्हे, संपूर्ण राज्यात महापालिका निवडणुका एकत्र लढणार

## अंतर्गत फुट थांबवण्यासाठीही महत्त्वाचे पाऊल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९नागपूर**

महाराष्ट्रातील आगामी महानगरपालिका निवडणुकेच्या दृष्टीने महायुतीने मोठे आणि निर्णायक पाऊल उचलले आहे. रात्री उशिरा झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत भाजप आणि शिवसेना शिंदे गटाने राज्यभरातील सर्व पालिका निवडणुका एकत्रित पद्धतीने लढण्याचा अंतिम निर्णय घेतल्याचे सूत्रांनी स्पष्ट केले आहे. या बैठकीपूर्वी काही महापालिकांमध्ये स्वतंत्र लढण्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू होती. मात्र हा निर्णय झाल्यानंतर आता महायुतीची निवडणूक रणनीती एकसंघ आणि अधिक आक्रमक असेल, असा अंदाज आहे. विशेष म्हणजे, मुंबई आणि ठाणे या दोन्ही महत्त्वाच्या पालिकांमध्येही महायुतीच उमेदवार उतरतील, हे स्पष्ट झाले आहे. या दोन्ही पालिका सध्या महाराष्ट्राच्या राजकीय भवितव्याच्या दृष्टीने निर्णायक मानल्या जात असल्याने, या निर्णयाचे महत्त्व अधिक वाढले आहे.



या महत्त्वाच्या चर्चेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रात्री दीड तास बंद दाराआड उपस्थिती चर्चा केली. निवडणुकीतील अनेक संवेदनशील मुद्दे, स्थानिक समीकरणे तसेच जागावाटपाची प्राथमिक चौकट यावर त्यांनी सविस्तर मंथन केले. राज्यभरात महापालिका निवडणुकांचे वातावरण तापत असताना सत्ता टिकवण्यासाठी आणि विरोधकांच्या रणनीतीला जोरदार उत्तर देण्यासाठी हा प्रयत्न असल्याचे राजकीय तज्ज्ञांचे मत आहे. सध्या महाविकास आघाडीही मजबूतपणे या निवडणुका लढवण्याच्या तयारीत असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन गटांमुळे बदललेले समीकरणही महायुती सावधपणे विश्लेषण करत आहे.

या बैठकीत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि माजी प्रदेशाध्यक्ष तसेच ऊर्जा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचीही उपस्थिती विशेष होती. राज्यभरात भाजपची संघटनात्मक शक्ती वाढवताना शिवसेना शिंदे गटासोबतची राजकीय जुळवाजुळव सुलभ करण्याचे काम या दोन्ही नेत्यांकडे आहे. त्यामुळे जागावाटपासह उमेदवारीची तयारी, प्रचारयोजना आणि स्थानिक स्तरावरील समन्वय वाढवण्यासाठी त्यांची भूमिका पुढील काळात अधिक निर्णायक ठरणार आहे. शिवाय, स्थानिक पातळीवरील नेतृत्व विकसित करून त्यांना निवडणुकीत महत्त्वाची संधी मिळावी, यावरही चर्चा झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

**कार्यकर्त्यांनी एकमेकांच्या पक्षात प्रवेश करू नये, अशी सहमती**

याच बैठकीमध्ये एक महत्त्वपूर्ण निर्णय म्हणजे, युतीतील दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांनी आणि पदाधिकाऱ्यांनी एकमेकांच्या पक्षात प्रवेश करू नये, अशी सहमती मिळाली आहे. मागील काही महिन्यांतील राजकीय विभाजन, फुट आणि प्रवेशामुळे तणावाची स्थिती वेळोवेळी निर्माण झाली होती. परंतु आता निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अंतर्गत कलह रोखणे आणि कार्यकर्त्यांमध्ये असलेली संशयाची भावना दूर करणे महायुतीसाठी अत्यावश्यक आहे. त्यामुळे आगामी काळात भाजप-शिवसेना शिंदे कार्यकर्ते एकत्र प्रचार करतील आणि स्थानिक पातळीवरील कोणतीही घुसखोरी किंवा गोंधळ रोखण्यासाठी पक्षांनी स्पष्ट निर्देश देण्याची तयारीही सुरू आहे.

**जागावाटपाची आणि प्रचाराच्या आराखड्याची प्राथमिक प्रक्रिया**

पुढील दोन ते तीन दिवसांत राज्यातील सर्व महानगरपालिकांच्या पातळीवर जागावाटपाची आणि प्रचाराच्या आराखड्याची प्राथमिक प्रक्रिया सुरू होईल. प्रत्येक शहराचे समाजगट, स्थानिक प्रस्थापित नेते, नवे चेहरे, आणि निवडणुकीतील जिंकण्याची क्षमता या सर्व मुद्द्यांवर विचार करून उमेदवार निश्चित केले जातील. महायुतीसाठी या निवडणुका प्रतिष्ठेच्या बनल्या आहेत आणि सत्ता स्थिर राहावी यासाठी ही निवडणूक जिंकणे अत्यंत गरजेचे आहे. विरोधकांकडून होणाऱ्या टीकेचा प्रतिकार करण्याबरोबरच, मतदारांपर्यंत महायुती सरकारच्या योजनांचा आणि निर्णयांचा संदेश पोहोचवणे हेही महत्त्वाचे आव्हान असेल. त्यामुळे या निर्णयानंतर महाराष्ट्रातील महापालिकांच्या राजकारणात मोठी चक्र फिरण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसू लागली आहेत.

# गोवा नाइट क्लब आग- थायलंडला पळून गेले दोन्ही मालक

## इंडिगोच्या विमानाने फुकेतला गेले



**विदर्भ प्रजासत्ताक दि.९पणजी**

गोव्यातील अर्पोरा गावात असलेल्या 'बिर्च बाय रोमियो लेन' नाइटक्लबमध्ये ६ डिसेंबरच्या मध्यरात्री आग लागल्यानंतर काही तासांतच क्लबचे दोन्ही मालक सौरभ आणि गौरव लूथरा थायलंडला पळून गेले.

पोलिसांनी घटनेनंतर एफआयआर नोंदवून दोघांचा शोध सुरू केला. ७ डिसेंबर रोजी दोघांविरुद्ध लुकआउट सर्कुलर जारी केले, परंतु इमिग्रेशन रेकॉर्डवरून असे दिसून आले की ते इंडिगो फ्लाइट ६ए १०७३ ने देश सोडून गेले होते.

पोलिसांनुसार, दोघे ७ डिसेंबरच्या सकाळी ५:३० वाजताच इंडिगोच्या विमानाने फुकेतला रवाना झाले. त्यांना पकडण्यासाठी आता इंटरपोलची मदत मागितली आहे.

तपासात हेदेखील समोर आले आहे की क्लबकडे अग्निशमन दलाचे एनओसी (ना हरकत प्रमाणपत्र) नव्हते. परवानादेखील अपुऱ्या माहितीच्या आधारे जारी करण्यात आला होता.

पणजीपासून २५ किमी दूर असलेल्या क्लबमध्ये आग लागल्याने २५ लोकांचा मृत्यू झाला होता. मृतांमध्ये नाइटक्लबचे २० कर्मचारी आणि ५ पर्यटक यांचा समावेश आहे.

# नागपूर अधिवेशनात पैशांचा बॉम्ब

## कर्जमाफीला पैसा नाही, पण नेत्यांकडे पैशांचे गड्डे, अंबादास दानवेंच्या व्हिडीओ मुळे खळबळ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९नागपूर**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी एक व्हिडिओ पोस्ट करत पुन्हा एकदा खळबजनक आरोप केला आहे. या व्हिडिओमध्ये एक व्यक्ती पैशांच्या भल्या मोठ्या गड्यांसह दिसत आहे. विशेष म्हणजे या व्हिडिओतील पैशांसह दिसणारा व्यक्ती हा आमदार असल्याचा आरोपही दानवे यांनी केला आहे. यावरुन त्यांनी राज्य सरकारवर टीका केली आहे. नगापूरमध्ये सध्या हिवाळी अधिवेशन सुरू आहे. अधिवेशनाच्या आजच्या दुसऱ्याच दिवशी दानवे यांनी केलेल्या या आरोपामुळे अधिवेशनात सत्ताधाऱ्यांना घेरण्याची ही विरोधकांना चांगली संधी मिळाली आहे.

या संदर्भात आपल्या पोस्टमध्ये अंबादास दानवे यांनी म्हटले की, 'या सरकारकडे फक्त शेतकरी कर्जमाफीला पैसा नाही.. बाकी सगळं ओक्के आहे! जनतेला




जरा सांगा मुख्यमंत्री फडणवीस आणि शिंदे जी, हे आमदार कोण आहेत आणि पैशांच्या गड्ड्यांसह काय करत आहेत?' असा प्रश्न अंबादास दानवे यांनी उपस्थित केला आहे

**अंबादास दानवेंचा धंदा ब्लॅकमेलचा : महेंद्र दळवींचा पलटवार**

व्हिडीओमध्ये दिसणारी व्यक्ती ही प्रत्यक्षात दळवीच असल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे. व्हिडीओमध्ये स्क्रीनवर व्हिडीओ कॉल सुरु असल्याचे तसेच लाल रंगाचा टी-शर्ट घातलेली व्यक्ती बॅगेतून सतत रोख बाहेर काढून टेबलावर एकापाठोपाठ एक बंडली रचत असल्याचा दावा आहे. हा व्हिडीओ समोर आल्यानंतरच सोशल मीडियावर चर्चांचा भडिमार झाला. सरकारचे जनप्रतिनिधीच जर नोटांची एवढी अफाट मोजणी करत असतील, तर यामागचा स्रोत काय? हे पैसे कुठून आले? या प्रश्नांच्या सरबत्तीमुळे सत्ताधारी अडचणीत आले असल्याचे चित्र दिसले.

# आमदारांच्या विमानवारीसाठी जनतेवर १४३ कोटींचा भार, ७५,२८६ कोटींचा पुरवणी मागणी प्रस्ताव सादर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९नागपूर**

महायुती सरकारने हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी तब्बल ७५,२८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्यांचा प्रस्ताव विधानमंडळात मांडला. यात राज्यातील अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या हवाई प्रवास आणि त्यांच्या अनुषंगिक खर्चासाठी १४३ कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीची तरतूद केली. हे १४३ कोटी जनतेकडून वसूल होणाऱ्या करातून खर्च होणार आहेत. दरम्यान, इंडिगो संकटामुळे सर्व आमदारांच्या हवाई प्रवासाची व्यवस्था सरकारने करावी, अशी मागणी विधान परिषदेत काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांनी केली. त्यावर उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री अजित पवार यांनी हवाई प्रवास मुंबईपुरता न ठेवता पुण्याला जाणाऱ्या आमदारांसाठीही ठेवा, असे सांगितले. त्यामुळे १४३ कोटींमधून आमदारांच्या विमानवारीचा खर्च होण्याची दाट शक्यता आहे.

दुसरीकडे अधिवेशन संपताच चंद्रपूर, नागपूर वगळता सर्व मनपा निवडणुकांचा बिगुल वाजणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. हजारो कोटी रुपये खर्चून बांधलेला समृद्धी महामार्ग, वंदे मातरमसह इतर सुपरफास्ट रेल्वे उपलब्ध असताना आमदारांसाठी हवाई सेवेचा हट्ट कशासाठी, असा प्रश्न उपस्थित होत आहे. महसूल व वन विभागाला सर्वाधिक १५,७२१.०८ कोटींचा निधी पुरवणी मागण्यांत नमूद आहे. नगर विकास (९,१९५.७६ कोटी), उद्योग, ऊर्जा (९,२०५,९० कोटी), कौशल्य विकास (६०९.७० कोटी), कृषी (६१६.२१ कोटी) सारख्या रोजगार व ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जोडलेल्या विभागांना तुलनेने कमी निधी आहे.

# रोहित आर्या दहशतवादी नसताना त्याचे एन्काऊंटर का केले? : काँग्रेसचा विधानसभेत सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९नागपूर**

पवई इथे रोहित आर्या नामक व्यक्तीने काही मुलांना ओलिस ठेवून सरकारकडे थकीत असलेले पैसे मागितले होते. पण त्यानंतरही त्याचे एन्काउंटरच्या माध्यमातून खून का करण्यात आला? असा सवाल काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज विधानसभेत उपस्थित केला.



रोहित आर्या नामक व्यक्तीने गत ३० ऑक्टोबर रोजी पवई स्थित आर के स्टुडिओत १७ मुलांसह दोघांना ओलीस ठेवले होते. त्याने सरकारकडे काही कोटी रक्कम थकीत असल्याचा आरोप केला होता. त्यानंतर पोलिसांनी त्याचे एन्काउंटर केले होते. विधानसभेत आज लक्षवेधीच्या माध्यमातून रोहित आर्या प्रकरण बाबत काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी प्रश्न मांडले.

रोहित आर्याने महायुती सरकार असताना स्वच्छता मॉनिटर आणि मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या प्रोजेक्टवर काम केले होते. त्याचे पैसे सरकारने थकवले होते. त्याने व्हिडिओ काढून सांगितले माझे पैसे द्यावे ,मी दहशतवादी नाही. अस असताना रोहित आर्यांचे एन्काऊंटर का करण्यात आले? पायावर गोळी का मारली नाही? नेमकी त्याचवेळी एन्काऊंटर स्पेशलिस्ट पोलिस कसा काय तिथे उपलब्ध होता? असे प्रश्न वडेट्टीवार यांनी उपस्थित केले.

या प्रकरणी रोहित आर्या याने वारंवार आंदोलन केले, उपोषण करून पैसे मागितले होतें पण तत्कालीन मंत्र्यांनी पैसे थकवल्याने ही घटना घडली.या प्रकरणी माजी मंत्र्यांची चौकशी केली का? सरकारकडे पैसे प्रलंबित आहे का? असा प्रश्न वडेट्टीवार यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून उपस्थित केला.

यावेळी उत्तर देताना मंत्र्यांनी या प्रकरणी चौकशी सुरू आहे. रोहित आर्याने लहान मुलांना ओलिस धरले म्हणून पोलिसांनी स्वरक्षणासाठी कारवाई केल्याचे स्पष्ट केले. मानवी हक्क आयोगाने समिती नेमून चौकशी करायला सांगितले त्यानुसार चौकशी सुरू आहे. यातील संबंधितावर कारवाई होईल अस आश्वासन मंत्र्यांनी दिले.

## संपादकीय ......

# महामार्गाचे दुखणे!

*मुंबई–गोवा महामार्ग नेहमीच चर्चेत राहिला आहे. आतापर्यंत ७ वेळा हा महामार्ग पूर्ण करण्याबाबत डेडलाईन दिल्या गेल्या; पण अद्यापही तो अपूर्णच आहे. आता आणखी एक नवीन डेडलाईन मिळाली आहे. गेली १४ वर्षे रखडलेल्या मुंबई–गोवा महामार्गाचा प्रश्न खासदार अरविंद सावंत यांनी संसदेत मांडला. आतापर्यंत दिलेल्या ७ डेडलाईन सरकार पाळू शकले नाही आणि आता संसदेत खासदार अरविंद सावंत यांच्या प्रश्नावर बोलताना केंद्रीय दळणवळणमंत्री नितीन गडकरी यांनी हा महामार्ग पूर्ण करण्याची शेवटची मुदत एप्रिल २०२६ दिली आहे.*

*म्हणजेच आणखी ५ महिन्यांनी हा महामार्ग पूर्ण होईल, असे यातून स्पष्ट होत असले तरी प्रत्यक्ष अपुरे काम आणि कामाचा वेग पाहता, या मुदतीत तरी काम पूर्ण होणार का, याबाबत प्रश्नचिन्हच आहे. खासदार अरविंद सावंत यांनी चंद्रावर जाण्याचा खर्च कमी आहे; पण मुंबई–गोवा महामार्ग हजारो कोटी रुपये खर्च करूनही अपुरा असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. यामागे ठेकेदारांचा हलगर्जीपणा, जमीन संपादनातील अडचणी, अशी कारणे असल्याचे गडकरी यांनी सांगितले. त्यांनी दिलेले उत्तर काही अंशी खरे असले, तरी क्षमता नसलेले ठेकेदार नेमले गेल्याने ही कामे रखडली, हे अधिक वास्तववादी उत्तर आहे.*

*सरकारने या महामार्गाचे ८९ टक्के काम झाल्याचे सांगितले आहे; परंतु हेही सत्य नाही. आतापर्यंत फक्त ७० टक्केच काम झाले आहे. जे काम पूर्ण झाले आहे, ते पणजी –राजापूरपर्यंत. लांजा बाजारपेठेतील उड्डाणपूल, संगमेश्वर येथील उड्डाणपूल, चिपळूण बाजारपेठेतील उड्डाणपूल, लोणेरे उड्डाणपूल, माणगाव–इंदापूर बायपास, कोलाड नाका येथील उड्डाणपूल, सुकेळी खिंड घाटरस्ता, वाकण ते नागोठणेदरम्यानचा मार्ग ही कामे वर्षानुवर्षे रखडली आहेत.*

*पहिला टप्पा हा पळस्पे फाटा ते इंदापूर सुरू होऊन १४ वर्षे झाली आहेत; तर इंदापूर ते गोवा या टप्प्याचे काम सुरू होऊन १० वर्षे झाली. मात्र, या दोन्ही टप्प्यांमध्ये कामे अपुरी आहेत. उड्डाणपूल न होण्यामागे ठेकेदारांचा निष्काळजीपणा हे मुख्य कारण आहे. वर्षानुवर्षे ठेकेदार काम करत नाहीत आणि त्यांना कुणी विचारतही नाही. त्यामुळे या कामांची प्रचंड हेळसांड झाली. २००९ मध्ये काँग्रेस सरकारच्या काळात पळस्पे ते इंदापूर टप्प्याचे काम सुरू झाले.मात्र, इंदापूर ते गोवा हा टप्पा २०१४ मध्ये नितीन गडकरी दळणवळणमंत्री झाल्यानंतरच सुरू झाला. या टप्प्यातच मोठ्या प्रमाणावर उड्डाणपूल रखडलेले आहेत. चिपळूणचा उड्डाणपूल कोसळल्यानंतर त्या उड्डाणपुलाचे कामच ठप्प झाले. ते आजतागायत सुरू झालेले नाही. रखडलेले सात उड्डाणपूल जोपर्यंत होणार नाहीत, तोपर्यंत हा महामार्ग पूर्ण होणे केवळ अवघड आहे. आता संसदेत कोकणचे सुपुत्र अरविंद सावंत यांनी हा मुद्दा लावून धरल्यामुळे या प्रश्नाकडे पुन्हा एकदा देशाचे लक्ष वेधले गेले.*

*मुंबई आणि कोकण यांचे नाते वर्षानुवर्षांचे आहे. साधारणत:, शंभर वर्षांपूर्वी मुंबई–गोवा महामार्गाची आखणी झाली. त्याकाळी ब्रिटिश सरकारने बांधलेले पूल अलीकडच्या काळापर्यंत टिकून होते. या महामार्गाचे चौपदरीकरण करण्याचा निर्णय २००७ साली झाला आणि २००९ मध्ये प्रत्यक्ष पहिल्या टप्प्याचे काम सुरू झाले. पहिला टप्पा १४ वर्षे, तर दुसरा टप्पा जवळपास १० वर्षे रखडलेला आहे. यामुळे जवळपास ७,५०० अपघात होऊन ३ हजारांवर लोकांना प्राण गमवावे लागले आहेत. तरीही महामार्गाचे काम अपूर्णच आहे. त्यामुळे कोकणात प्रचंड असंतोष आहे.*

*अनेक मंत्र्यांचे महामार्गाचे दौरे झाले. त्यामध्ये काँग्रेस सरकारच्या काळात तत्कालीन सार्वजनिक बांधकाममंत्री अशोक चव्हाण यांच्यापासून ते चंद्रकांत पाटील, रवींद्र चव्हाण, त्यानंतर आताचे सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले अशी नावांची लांबलचक यादी आहे. त्यांनी आतापर्यंत दिलेल्या ७ मुदती कालबाह्य ठरल्या. आता संसदेत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी शेवटची मुदत एप्रिल २०२६ ही दिली आहे. या कालमर्यादेत तरी हा महामार्ग पूर्ण होवो, हीच अपेक्षा.*

# टेंपल ते कुंदन; ज्वेलरीच्या बदलत्या ट्रेंडला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



दागिने हा मानवाच्या सांस्कृतिक प्रवासाचा अविभाज्य घटक मानला जातो. प्राचीन काळापासून निसर्गाशी एकरूप होण्याच्या प्रेरणेतून माणसाने पानं, फुलं, शंख–शिंपले, हाडं–पिसं यांसारख्या वस्तूंनी स्वत:ला अलंकृत करण्यास सुरुवात केली. पुढे सोनं–चांदी, धातू आणि रत्नांच्या शोधामुळे दागिन्यांच्या कलाकुसरीला नवे आयाम मिळाले. जगातील कोणतीही संस्कृती दागिन्यांपासून दूर राहिलेली नाही; कारण दागिना हा केवळ अलंकार नसून सांस्कृतिक उत्कर्षाचा आणि सौंदर्यबोधाचा इतिहास आहे.

स्त्री आणि दागिना यांचे नाते जन्मजात मानले जाते. आजीचा नाणेहार, आईच्या बांगड्या किंवा स्वत:साठी विकत घेतलेलं कानातलं–प्रत्येक दागिन्यात आठवणींचा हळवा धागा गुंफलेला असतो. म्हणूनच दागिने घालायला आवडत नाही अशी स्त्री विरळाच. पारंपरिक असो वा आधुनिक, हलकी ॲक्सेसरी असो वा जडावाचे दागिने–प्रत्येक दागिन्यात स्त्रीचं रूप खुलवण्याची ताकद असते.

दागिन्यांवर स्त्रियांची मक्तेदारी असल्याचा समज असला तरी आपल्या संस्कृतीत पुरुषांचेही अंगठ्या, साखळ्या, ब्रेसलेट, ब्रुच यांसारखे दागिने आजही लोकप्रिय आहेत. नव्या पिढीला प्लॅटिनम, सोनं, चांदी तसेच पारंपरिक पद्धतीने घडवलेली दागिने घालण्याची विशेष आवड दिसते. यामधून ते आपल्या सांस्कृतिक मुळांशी नाळ जोडण्याचा प्रयत्न करतात.

फॅशनमध्ये 'क्लासिक कॉन्ट्रास्ट' ज्वेलरीची लोकप्रियता वाढत असून लाल, निळे, पिवळे अशा ठसठशीत रंगांच्या ज्वेलरींचा पोशाखानुसार वापर हा नवा ट्रेंड आहे. टेंपल ज्वेलरी, कुंदन, खऱ्या फुलांचे दागिने, ब्राह्मणी नथ, वेल, झुबे, भोकर, कुड्या यांसारखे पारंपरिक अलंकार तरुणींपर्यंतही पोहोचले आहेत.

सौभाग्यालंकारांचे ट्रेंड बदलले असले तरी त्यांचे सांस्कृतिक आणि भावनिक महत्त्व आजही कायम आहे. दैनंदिन वापरात हलके, नाजूक हिऱ्याचे दागिने आणि मिनिमलिस्टिक डिझाइन्सला जास्त मागणी असून सण–समारंभात पारंपरिक सोन्याची ज्वेलरी आवर्जून परिधान केली जाते. व्यक्तिनिहाय आवड वेगळी असली तरी दागिन्यांची मोहिनी मात्र सर्वांनाच सारखी भुरळ घालते.

# आदिवासी विकास महामंडळाकडून ८८८ क्विंटल मका खरेदी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–** आदिवासी विकास महामंडळाच्या धारणी कार्यालयामार्फत खरीप पणन हंगाम २०२५–२६ मध्ये शासनाच्या किंमत समर्थन योजनेंतर्गत धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील शेतकऱ्यांकडून एफएक्यू दर्जाचे ज्वारी, बाजरी, मका, रागी भरडधान्य खरेदी करण्यात येत आहे. यात आतापर्यंत ८८८ क्विंटल मका खरेदी करण्यात आली आहे.



हमी भावाने धान्य खरेदीसाठी नोंदणी कालावधी हा दि. १५ डिसेंबरपर्यंत राहणार असून खरीदी दि. २८ फेब्रुवारी २०२६ पर्यंत सुरू राहणार आहे. महामंडळाकडे आतापर्यंत एक हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केलेली असून त्यापैकी २४८ शेतकऱ्यांकडून ८८८.४० क्विंटल मका खरेदी करण्यात आली आहे.जिल्ह्यात धारणी उप प्रादेशिक कार्यालयांतर्गत बैरागड, सावलिखेड़ा, साद्राबाडी, चाकर्दा, हरीसाल, धारणी आणि चिखलदरा अंतर्गत चुरणी, गोलखेडा बाजार येथे खरेदी केंद्र सुरू आहे. खरेदी केंद्रावर धान्य आणण्यापूर्वी व्यवस्थितरीत्या वाळवून, स्वच्छ करून आणावे, तसेच शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रे घेऊन राज्य शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रादेशिक व्यवस्थापक संतोष आमटे यांनी केले आहे.

# थंडीची लाट : उच्च रक्तदाब रुग्णांनी घ्यावी विशेष काळजी

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक**




जिल्ह्यात वाढू लागलेल्या थंडीच्या तीव्रतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम दिसू लागला आहे. तापमान झपाट्याने घसरत असल्याने अनेकांना रक्तदाब वाढण्याचा त्रास जाणवतो आहे. तज्ज्ञांच्या मते




हिवाळ्यात रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, ज्यामुळे रक्तप्रवाहावर अतिरिक्त दाब येतो आणि परिणामी रक्तदाब वाढतो. विशेषत: आधीपासून उच्च रक्तदाबाने ग्रस्त असलेल्या रुग्णांसाठी हा काळ अधिक धोकादायक ठरतो. योग्य काळजी न घेतल्यास हृदयविकारासह अनेक गुंतागुंत निर्माण होऊ शकते, अशी चेतावणी डॉक्टरांनी दिली आहे.

जिल्ह्यात तापमानात सतत चढ–उतार होत असून हवामान विभागाने पुन्हा एकदा थंडीची लाट येण्याची शक्यता वर्तवली आहे. गारठा वाढताच रक्तवाहिन्या आणखी अरुंद होतात. यामुळे रक्तदाब अचानक वाढण्याचा धोका निर्माण होतो. तज्ज्ञ सांगतात की थंडीत शरीर स्वत:ला उबदार ठेवण्यासाठी अधिक ऊर्जा खर्च करते. परिणामी हृदयावर जादा ताण येतो आणि मेंदू व हृदयापर्यंत पुरेसा रक्तपुरवठा न झाल्यास हृदयविकाराचा झटका येण्याचीही शक्यता वाढते.

थंडीमध्ये हातपायाची बोटे, कान, नाक यांसारखे शरीराचे टोकाचे अवयव सर्वप्रथम गारठतात. यामुळे रक्तप्रवाह मंदावतो आणि उच्च रक्तदाबाची लक्षणे तीव्रतेने जाणवू शकतात. अनेक नागरिकांनी अंगदुखी, थकवा, छातीत जळजळ, चक्कर येणे अशा तक्रारी व्यक्त केल्या आहेत.

तज्ज्ञांच्या मते, हिवाळ्यात रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यासाठी संतुलित आणि गरम आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि वेळेवर औषधोपचार आवश्यक आहेत. थंडीच्या दिवसांत गरम कपडे परिधान करणे, अचानक थंड वाऱ्यात जाणे टाळणे आणि शरीराला उबदार ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

थंडीमुळे हायबीपीच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने जिल्ह्यात हिवाळ्यात मृत्यूचे प्रमाणही वाढत असल्याचे वैद्यकीय अधिकारी सांगतात. नागरिकांनी योग्य वेळी तपासणी करून आवश्यक ती काळजी घेतल्यास हा धोका लक्षणीयरीत्या कमी होऊ शकतो, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

# उन्हाळी भुईमूग व तीळ पिकांच्या प्रमाणित बियाण्यासाठी मिळणार १००% अनुदान; कशी कराल नोंदणी?

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक**

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान–तेलबिया (NMEO-OS) हे खाद्यतेलांच्या आयातीवरील भारताचे अवलंबित्व कमी करण्यासाठी आणि देशांतर्गत तेलबियांचे उत्पादन वाढवून आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न सुधारून आत्मनिर्भरतेकडे जाण्यासाठी तयार केले गेले आहे.

अभियानांतर्गत पिकाची उत्पादकता वाढ व सुधारित वाणांच्या प्रसारासाठी उन्हाळी हंगाम २०२५ करिता भुईमूग पिकासाठी हेक्टरी १५० किलो (रक्कम रु. ११४/किलो) शेंगा व तिळासाठी हेक्टरी २.५ किलो (रक्कम रु. १९७/किलो) प्रमाणित बियाणे १००% अनुदानावर वितरित करण्यात येणार आहे.




भुईमूग पिकाचे १००% अनुदानावर प्रमाणित बियाणे याचा लाभ नाशिक, धुळे, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, छत्रपती संभाजी नगर व अकोला या ९ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना द्यावयाचा आहे.

तसेच तिळ पिकाचे १००% अनुदानावर प्रमाणित बियाणे याचा लाभ जळगाव, बीड, लातूर व बुलढाणा या ४ जिल्ह्यातील शेतकऱ्यांना द्यावयाचा आहे. यासाठी प्रति लाभार्थी किमान ०.२० हेक्टर व कमाल १ हेक्टर मर्यादित लाभ देय आहे.

शासकीय बियाणे पुरवठादार संस्थांचा भुईमुगासाठी २० किलो किंवा ३० किलो तसेच तिळासाठी ५०० ग्रॅम किंवा १ किलो याप्रमाणे पॅकिंग साईज आहे.

शेतकऱ्यांना बियाण्याच्या पॅकिंग साईज नुसार प्रमाणित बियाणे वितरित करण्यात येईल. त्यामुळे क्षेत्रानुसार आवश्यक बियाण्यापेक्षा पॅकिंग साईज नुसार अधिकचे बियाणे परीगणित होत असल्यास याकरिताची रक्कम शेतकऱ्यांनी स्वहिश्याने भरावी लागेल.

भुईमूग व तीळ पिकाच्या बियाण्याचा लाभ घेण्यासाठी MahaDBTया संकेतस्थळावर

प्रमाणित बियाणे वितरण, प्रात्याक्षिके, फ्लेक्झि घटक औषधे आणि खते या

टाईल अंतर्गत सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

१००% अनुदानावर प्रमाणित बियाणे वितरण या घटकासाठी अर्ज सादर करण्यासाठी शेतकऱ्यांची –सीळींरिलज्ञ वर नोंदणी असणे बंधनकारक आहे. लाभार्थी निवड लक्षांकाच्या अधीन राहून प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

त्यामुळे या घटकासाठी जास्तीत जास्त इच्छुक शेतकरी बांधवांनी अर्ज करावेत आणि लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विभाग त्याच्या कार्यालयाशी संपर्क साधावा.

# खत महागाईचा फटका रब्बी पिकांना; उत्पादन खर्चात मोठी वाढ

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती** राशी हंगामातील पेरणी अंतिम टप्प्यात असताना रासायनिक खतांच्या किमतीत अचानक वाढ झाल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा काही खतांच्या बॅगचे दर तब्बल ३८० रुपयांपर्यंत वाढले असून, या महागाईचा मोठा फटका शेतकऱ्यांच्या आधीच डळमळीत झालेल्या अर्थकारणाला बसत आहे.

नोव्हेंबर महिन्यात रब्बी पेरणीला सुरुवात झाल्यानंतर शेतकऱ्यांना गहू, हरभरा व इतर पिकांसाठी बी–बियाणे, खते आणि कीडनाशके यांचा पुरेसा साठा करावा लागतो. मात्र खतांच्या वाढलेल्या दरांमुळे हा साठा करणे शेतकऱ्यांसाठी मोठे आव्हान बनले आहे. महागाईमुळे शेतकऱ्यांना आवश्यक तेवढे खत विकत घेणेही कठीण झाले आहे.



यंदाच्या खरीप हंगामात अतिवृष्टीमुळे सोयाबीन, कापूस आणि इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. उत्पन्नाचा मोठा स्रोत हातातून गेल्यानंतर शेतकरी आर्थिकदृष्ट्या कोलमडले आहेत. अशात रब्बी हंगामाकडून आशा ठेवणाऱ्या शेतकऱ्यांना आता खतांच्या महागाईने आणखी संकटात ढकलले आहे. सध्या रब्बीतील गहू व हरभरा पिके जोमाने वाढत असली, तरी त्यांच्या वाढीसाठी आवश्यक असलेले खत शेतकऱ्यांना महागात पडत आहे.पिकांच्या उत्पादन खर्चात सातत्याने वाढ होत आहे; परंतु शेतमालाच्या किमती मात्र स्थिर आहेत. त्यामुळे उत्पादन खर्च आणि बाजारभावातील वाढता तफावत शेतकऱ्यांसमोर गंभीर पेच निर्माण करत आहे. खतांच्या वाढलेल्या दरांमुळे उत्पादन खर्च वाढल्याने शेती व्यवसाय आणखी खर्चिक होत चालला आहे.शेतकरी संघटनांनी सरकारने खतांच्या किमती स्थिर ठेवाव्यात आणि शेतकऱ्यांवर आलेला आर्थिक भार कमी करण्यासाठी योग्य उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली आहे. आगामी दिवसांत खतांच्या किमती आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# विधिमंडळ हिवाळी अधिवेशन–२०२५ 'दूरध्वनी पुस्तिका' प्रकाशित

## माहिती विभागाचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांच्या हस्ते प्रकाशन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९नागपूर–** महाराष्ट्र विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे तयार करण्यात आलेल्या 'हिवाळी अधिवेशन २०२५ दूरध्वनी पुस्तिके'चे प्रकाशन आज माहिती विभागाचे प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. नागपूर येथे अधिवेशनाकरिता येणाऱ्या राजकीय प्रतिनिधी, अधिकारी, पत्रकार व नागरिकांना संबंधित शासकीय यंत्रणेशी सुलभ आणि त्वरित संपर्क साधता यावा, या उद्देशाने ही विस्तृत मार्गदर्शिका तयार करण्यात आली असून संबंधितांना ही उपयुक्त ठरेल असे ब्रिजेश सिंह यांनी याप्रसंगी सांगितले.यावेळी मान्यवरांच्या हस्ते या दूरध्वनी पुस्तिकेच्या क्यू आर कोड चेही प्रकाशन करण्यात आले. या क्यू आर कोडमुळे संपूर्ण दूरध्वनी पुस्तिका आता डिजिटल स्वरूपात सहजपणे ऑनलाईन उपलब्ध झाली आहे, ज्यामुळे पुस्तिका छापाईसाठी लागणाऱ्या शासनाच्या निधीतही मोठ्या प्रमाणात बचत झाली आहे.

**पुस्तिकेतील संपर्क माहितीचा तपशील:** अधिवेशनाच्या काळात सुलभ समन्वयासाठी अत्यंत उपयुक्त ठरणारी ही दूरध्वनी पुस्तिका दोन भागांत विभागली आहे:भाग–१ (राजकीय व व्यवस्थेशी संबंधित): यात प्रामुख्याने मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, मंत्रिमंडळाचे सदस्य, विधानमंडळाचे प्रमुख (अध्यक्ष, सभापती) यांची कार्यालये व



निवासस्थाने यांचे संपर्क क्रमांक समाविष्ट आहेत. तसेच, विधान भवन, हैदराबाद हाऊस, रवी भवन आणि नाग भवन येथील तात्पुरत्या निवास व कार्यालयाच्या व्यवस्थापनाचे संपर्क क्रमांक देण्यात आले आहेत. यासह, महाराष्ट्रातील महत्त्वाच्या अधिकाऱ्यांचे संपर्क आणि नागपूर शहर परिसरातील वैद्यकीय सुविधा, पर्यटन स्थळे व परिवहन (रेल्वे, विमान वाहतूक) संबंधी माहितीही उपलब्ध आहे.

भाग–२ (शासकीय कार्यालये): यात नागपूरमधील विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलीस विभाग, न्याय व्यवस्था आणि विविध प्रशासकीय विभाग (सार्वजनिक बांधकाम, वित्त, जलसंपदा) व स्थानिक स्वराज्य संस्था (मनपा/एनआयटी) यांच्या कार्यालये व

### क्यू. आर. कोडमुळे डिजिटल पुस्तिका सहज उपलब्ध

अधिकाऱ्यांचे विस्तृत संपर्क क्रमांक समाविष्ट आहेत.पुस्तिका प्रकाशन सोहळ्याला सामान्य प्रशासन विभागाचे प्रभारी उपसचिव अजय भोसले, कक्ष अधिकारी युवराज सोरेगावकर, माहिती विभागाचे संचालक (प्रशासन) किशोर गांगुर्डे, नागपूर– अमरावती विभागाचे संचालक डॉ.गणेश मुळे व संचालक (वृत्त) गोविंद अहंकारी, महासंचालक यांचे विशेष कार्य अधिकारी इरशाद बागवान व जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार हे उपस्थित होते.या दूरध्वनी पुस्तिका निर्मितीसाठी गडचिरोलीचे प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी गजानन जाधव, नागपूर माहिती विभागातील सहायक संचालक पल्लवी धारव, माहिती अधिकारी रितेश भुयार, माहिती अधिकारी अतुल पांडे तसेच माध्यम समन्वयक अनिल गडेकर आणि शासकीय मुद्रणालयाचे सहकार्य लाभले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब – पोर्टल /ई – पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. ९ डिसेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# ऐन विधीमंडळाच्या अधिवेशनात अधिकाऱ्यांच्या संपाने प्रशासन अडचणीत

## जिल्ह्यातील राजपत्रित अधिकारी बेमुदत संपवार



**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती** आर्वीच्या बीडीओंना अटक केल्याच्या निषेधार्थ जिल्ह्यातील गटविकास अधिकाऱ्यांनी सामूहिक रजा आंदोलन सुरू केले होते. त्यात जिल्ह्यात राजपत्रित अधिकारी संवर्गामध्ये येणारे अतिरिक्त सीईओ, प्रकल्प संचालक, उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी पाठिंबा देत दोन दिवसांच्या सामूहिक रजा आंदोलन केले. आता त्यानंतर सोमवारपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला. संघटनेच्या मागणीवर शासनाकडून दखल न घेतल्याने सदरचा निर्णय घेण्यात आल्याचे संघटनेच्या वतीने सांगण्यात आले. हिवाळी अधिवेशनाच्या ऐन पहिल्यादिवसांपासून सुरू झालेल्या या आंदोलनामुळे जिल्हा परिषद प्रशासनाला मात्र अडचणीचा सामना करावा लागणार आहे.आर्वी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारीयांना मनरेगा योजनेतील कथित अपहारप्रकरणात अटक करण्यात आल्याने या घटनेच्या निषेधार्थ महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेने ४ व ५ डिसेंबर या दोनदिवशी सामुहीक रजा आंदोलन पुकारले होते. घरकूल व मनरेगा योजनांमध्ये जबाबदारीनिर्धारणाबाबतचीमागणी या निमित्याने शासनाकडे करण्यात आली असताना यावर दोन दिवसांत शासनाकडून कुठलीच दखल घेण्यात आली नाही. त्यामुळे महाराष्ट्र विकास सेवा राजपत्रित अधिकारी संघटनेने ८ डिसेंबरपासून राज्यभर सामूहिक रजाआंदोलन सुरू करण्याची घोषणा केली आहे. याबाबत सोमवारी अतिरिक्त सीईओंसह ग्रामिण विकास यंत्रनेच्या प्रकल्प संचालक, उपमुख्य कार्यकारी अधिकारी तसेच सर्वच बिडीओ, साहाय्यक बिडीओ यांनी सीईओंना निवेदन दिले. तसेच जिल्हा परिषदेसमोर निदर्शने केली. जोपर्यंत शासनाकडून सकारात्मक आणि स्पष्ट निर्णय जाहीर होत नाही, तोपर्यंत महाराष्ट्र विकास सेवा संवर्गातील सर्व अधिकारी सामूहिक रजेवर राहतील. असा इशारा देण्यात आला आहे. ऐन हिवाळी अधिवेशानात या अधिकाऱ्यांच्या संपामुळे प्रशासन अडचणीत आले आहे. आंदोलनात अतिरिक्त सीईओ विनय ठमके, प्रकल्प संचालक प्रिती देशमुख, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्रीराम कुळकर्णी, बालासाहेब बायस, बाळासाहेब रायबोले, बिडीओ विनोद खेडकर, तुषार दांडगे, सुदर्शन तुपे, सुधिर अरबट, प्रिती खटींग, सुनिल गवई, कल्पना जायभाये, मिना म्हसतकर, प्रविण वानखडे, संजय खारकर आदींसह राजपित्रत अधिकारी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी झाले आहेत.

# रिम्स रुग्णालयाच्या संचालक मंडळावर कारवाई करा

### शिवसेना (उबाठा)शहर प्रमुख प्रवीण हरमकर यांची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती** रिम्स रुग्णालयाने अपघातातील जीवित रुग्णास मदत न केल्याने त्याचा मृत्यू झाला, याला रुग्णालय जबाबदार असून रुग्णालयावर कठोर कारवाई करण्यात यावी, या मागणीचे निवेदन शिवसेना शहर प्रमुख प्रवीण हरमकर यांच्या नेतृत्वात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे यांना देण्यात आले.अमरावती-बडनेरा रोडवरील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निष्काळजीपणामुळे ३० नोव्हेंबर रोजी घडलेल्या अपघातात दोन मुलांना गंभीर दुखापत झाली. त्यापैकी एका मुलाचा घटनास्थळी मृत्यू झाला तर दुसरा गंभीर जखमी नितीन व्यास याला तातडीच्या उपचारांची गरज होती.त्याला त्वरित रिम्स रुग्णालयात उपचारासाठी नेले. परंतु तेथे अत्यंत धक्कादायक, अमानवीय व दुर्लक्षपूर्ण वर्तन अनुभवास आले. डॉक्टरांनी सांगितले की, व्हेंटिलेटर उपलब्ध नाही, तसेच आयसीयूमध्ये जागा नाही, असे म्हणत रुग्णाला कोणतीही वैद्यकीय मदत न देता परत पाठवले. रुग्णाची स्थिती गंभीर असताना देखील प्राथमिक उपचार, स्थिरीकरण, आपत्कालीन केअर काहीही दिले गेले नाही. या विलंबामुळे उपचाराची महत्त्वाची सुवर्णवेळ गेली. नंतर रेडियंट हॉस्पिटल येथे डॉक्टरांनी शॉक देऊन सर्व प्रयत्न केले; परंतु जखमीला मृत घोषित करण्यात आले. रिम्स रुग्णालयाच्या निष्काळजी व अमानवीय वर्तनामुळेच नितीन व्यासचा मृत्यू झाल्याचे निवेदनात म्हटले आहे.

योग्यवेळी योग्य उपचार मिळाले असते तर त्याचा जीव वाचू शकला असता. क्लिनिकल इंस्टाब्लिशमेंटस ॲक्ट २०१० (कलम १०). प्रायव्हेट हॉस्पिटलला इमर्जन्सी रुग्णाला (अपघातात जखमी जीव धोक्यात) नकार देणे किंवा उपचार थांबवणे, रुग्णस्थिरहोईपर्यंत मोफत / तत्काळ मदत देणे अनिवार्य आहे. अपघातानंतर रुग्ण नेल्यानंतर रिम्सने केलेले व्यवहार गाडीतून उतरविणे, आत घेणे, मदत नाकारणे, परत गाडीमध्ये ठेवणे, हे नियमभंग आहे. यासंदर्भात दंडात्मक कारवाई तसेच रुग्णालयाचा परवाना निलंबित करावा, असे निवेदनात नमूद आहे.

तत्काळ रिम्स रुग्णालयाविरुद्ध उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी, सीसीटीव्ही फुटेज (रात्री १ ते १:३०) तातडीने तपासण्यात यावे, आपत्कालीन उपचार न देणारे संबंधित अधिकारी, डॉक्टर व कर्मचारी यांच्यावर क्लिनिकल इंस्टाब्लिशमेंटस ॲक्ट २०१० (कलम १०) नुसार शिस्तभंगाची कारवाई करावी, या रुग्णालयाच्या आपत्कालीन प्रणालीची तपासणी व दुरुस्ती करण्यात यावी, मृताच्या कुटुंबाला न्याय मिळावा, असे निवेदनात नमूद आहे.निवेदन देतांना पंजाब तायवाडे, विनीदं शर्मा, कमलेश गुप्ता, राजू हेरे, निकेश शर्मा, मनीष रामावत, ईश्वर खळेकार, प्रमोद वानखडे, सागर ढोके, नरेंद्र शेळके, बंडू कथिलकर, रामा सोळंके, विजय ठाकरे, विनोद मंडळाकर, अजमत खान, सय्यद शकील शिवसैनिक उपस्थित होते.

## ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ; तरीही अनेक बहिणींना सुधारित नियमांचा पत्ता नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती** लाडक्या बहिणींना ई-केवायसी प्रक्रिया करता यावी यासाठी राज्य शासनाने ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे. तसेच ज्या लाभार्थींना पती किंवा वडिलांचे आधारकार्ड उपलब्ध नसल्यामुळे ई-केवायसी करता येत नव्हती, त्यांच्यासाठी सुधारित नियम जारी करून अंगणवाडीताईंना शिफारसपत्र देण्याचा अधिकार बहाल करण्यात आला आहे. या संदर्भात शासनाचा अध्यादेशही प्रसिद्ध झाला आहे.मात्र या सुधारित नियमांची माहिती अनेक लाडक्या बहिणींपर मिळालेलीच नाही. परिणामी सुधारित आदेशांची अंमलबजावणी गावपातळीवर पूर्ण क्षमतेने सुरूच होत नाही. अंगणवाडीताईंना दिलेला अधिकार व त्यासाठी ठरविलेली प्रक्रिया प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत न पोहोचल्याने अनेक महिलांची ई-केवायसी प्रक्रिया अर्धवट अडकून पडली आहे.विधवा, परित्यक्ता किंवा पती-वडिलांचे निधन झालेल्या लाभार्थींना सर्वाधिक दिलासा देणारा हा सुधारित नियम असला, तरी त्याची माहिती न मिळाल्याने अनेक बहिणी अजूनही जुन्याच




कागदपत्रांच्या शोधात भटकताना दिसत आहेत. काही ठिकाणी अंगणवाडी सेविकांच्याही अनभिज्ञतेमुळे लाभार्थींना योग्य मार्गदर्शन मिळत नसल्याच्या तक्रारी समोर येत आहेत.शासनाने केलेल्या बदलांचा फायदा सर्वांना मिळावा यासाठी नियमानुसार व्यापक जनजागृती गरजेची असून, गावपातळीवरील मार्गदर्शनाची व्यवस्था मजबूत करण्याची मागणी होत आहे. सुधारित नियमांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचल्यास लाडक्या बहिणींची ई-केवायसी प्रक्रिया सुलभ होऊन आर्थिक मदत वेळेत मिळू शकणार आहे.

## कफ सिरपसाठी डॉक्टरांची चिठ्ठी अनिवार्य

### प्रत्येक नोंदीचा रेकॉर्ड ठेवणे बंधनकारक

**विदर्भ प्रजासत्ताकदि.९अमरावती** मध्य प्रदेशात कफ सिरपचे सेवन केल्यामुळे अनेक लहान मुलांचा मृत्यू झाल्याच्या धक्कादायक घटनेने देशभरात तीव्र प्रतिक्रिया उमटली होती. या गंभीर प्रकाराची तात्काळ दखल घेत केंद्र सरकारने कफ सिरप विक्रीसंदर्भातील नियम अधिक कठोर केले आहेत. आता कोणताही औषध विक्रेता डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय कफ सिरपची विक्री करू शकणार नाही. यासोबतच प्रत्येक प्रिस्क्रिप्शनची नोंद ठेवणे सर्व औषध विक्रेत्यांना बंधनकारक करण्यात आले आहे.हा निर्णय औषध सल्लागार समितीच्या ६७व्या बैठकीत घेण्यात आला. समितीने स्पष्ट केले की, कफ सिरपच्या अनियंत्रित विक्रीवर नियंत्रण आणणे आणि नागरिकांना डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेण्यापासून परावृत्त करणे हे या निर्णयामागील प्रमुख उद्दिष्ट आहे. आतापर्यंत बहुतांश कफ सिरप ओव्हर-द-काउंटर सहज उपलब्ध होत होते; मात्र नव्या नियमांनुसार या औषधांना आता ओटीसी यादीतून वगळण्यात आले आहे.नियमानुसार औषध विक्रेत्यांना डॉक्टरांनी दिलेल्या प्रत्येक प्रिस्क्रिप्शनची अचूक नोंद ठेवावी लागणार आहे. रेकॉर्ड न ठेवल्यास किंवा प्रिस्क्रिप्शनशिवाय कफ सिरप विक्री केल्यास संबंधित केमिस्टवर कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते. यात परवाना रद्द करणे, दंड आकारणे किंवा इतर कठोर दंडात्मक उपायांचा समावेश असेल, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे.

कफ सिरपचे उत्पादन, गुणवत्ता तपासणी यासंदर्भातील नियमदेखील अधिक कठोर करण्यात आले आहेत. फॉर्म्युलेशन, बॅच तपासणी, लेबलिंग इत्यादी सर्व टप्प्यांवर आता अधिक काटेकोर मानके लागू केली जातील.

हा निर्णय का?मध्य प्रदेशातील बनावट किंवा निकृष्ट दर्जाच्या कफ सिरपमुळे अनेक बालकांचे मृत्यू झाल्यानंतर देशभरात औषधांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. औषध सल्लागार समितीने या बाबींचा सखोल आढावा घेऊन कफ सिरपची अनियंत्रित विक्री धोकादायक ठरू शकते, असे मत नोंदवले. त्यानंतरच डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय कफ सिरप न देण्याचा निर्णय एकमुखाने घेण्यात आला.या नव्या नियमांमुळे औषधांच्या सुरक्षिततेत वाढ होईल आणि नागरिकांना योग्य वैद्यकीय मार्गदर्शन मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



#### ओव्हर द काउंटर विकल्यास काय कारवाई?

डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय ओव्हर द काउंटर औषध विकणे हे कायद्याचे उल्लंघन आहे आणि यासाठी केमिस्टवर कारवाई होऊ शकते, ज्यात परवाना रद्द करणे, दंड किंवा इतर कायदेशीर कारवाईचा समावेश असू शकतो. यासंदर्भात भारत सरकारने कठोर नियम लागू केले आहेत,-

## मनरेगा : लाखो लाभार्थ्यांची अडचण दूर !

### वैयक्तिक कामांची मर्यादा सात लाखांपर्यंत



**विदर्भ प्रजासत्ताकदि.८अमरावती**

केंद्र सरकारने मनरेगा अंतर्गत वैयक्तिक योजनाच्या कामांसाठीची आर्थिक मर्यादा मोठ्या प्रमाणात वाढविली आहे. वैयक्तिक योजनामध्ये सिंचन विहिरी, शेततळे, जमीन विकास, फलोत्पादन व वृक्ष लागवड आदि योजनाचा समावेश आहे.या योजनांसाठी पूर्वी निर्धारित दोन लाखांची मर्यादा आता थेट सात लाखांपर्यंत वाढविण्यात आली आहे. यामुळे या योजना पूर्ण करण्यात येणारी आर्थिक अडचण दूर झाली असून योजनांच्या अंमलबजावणीला वेग येणार आहे. दोन लाखांच्या मर्यादेत ही कामे करणे अशक्यप्राय ठरले होते. काही महिन्यांपासून प्रलंबित असलेल्या कामांमुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना यामुळे मोठा दिलासा मिळणार आहे.मनरेगा योजनेत विहिरी, शेततळे, जमीन विकास, फलोत्पादन आणि वृक्ष लागवड यासारख्या वैयक्तिक कामांसाठी केंद्र सरकारने दोन लाखांची मर्यादा निश्चित केली होती. मात्र राज्य सरकार विहिरींसाठी पाच लाखांपर्यंत अनुदान देत असल्याने केंद्रीय मर्यादेमुळे अनेक कामे रखडली होती. तांत्रिक अडथळ्यांमुळेही प्रलंबित राहिली होती. नवीन मर्यादा लागू झाल्याने लाभार्थ्यांच्या वैयक्तिक कामांना वेग मिळणार आहे.मनरेगांतर्गत शासनाच्या एकूण २६२ कामांची अंमलबजावणी केली जाऊ शकते. त्यापैकी ६७ कामे वैयक्तिक लाभाची, ११ कामे बचत गटांसाठी तर उर्वरित सार्वजनिक हिताच्या स्वरूपातील आहेत. पंचायत समिती अंतर्गत शोषखड्डे, शेततळे, विहीर पुनर्भरण, जैविक खत निर्मिती, गांडूळखत उत्पादन; लघुपाट विभागाअंतर्गत पाझर तलाव, वन तलाव, गाव तलाव; तर कृती विभागांतर्गत सीटीसी, डीसीसीटी, कंपार्टमेंट बंडिंग, कंटूर बंडिंग, लहान व मोठे माती बंधारे आदी कामे केली जातात.

## खत विक्रीसाठी पीएमकेएसके नोंदणी अनिवार्य

### सहकारी सोसायट्यांना १५१ व्यवसायांची मुभा, सचिवांवर अंमलबजावणीची जबाबदारी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती -** जिल्ह्यासह राज्यातील सर्व सहकारी सोसायट्यांसाठी खत विक्रीची प्रक्रिया आता अधिक शिस्तबद्ध व नियमनबद्ध करण्यात आली आहे. खत विक्री करू इच्छिणाऱ्या सर्व सहकारी संस्थांना आता प्रधानमंत्री कृषी समृद्धी केंद्र (पीएमकेएसके) योजनेअंतर्गत नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या प्रक्रियेनंतरच खत विक्रीसाठी परवानगी दिली जाणार आहे. सहकार विभागाने याबाबत स्पष्ट निर्देश जारी करून अंमलबजावणीची जबाबदारी संबंधित सहकारी संस्थांच्या सचिवांकडे सोपविली आहे.

पीएमकेएसके योजनेअंतर्गत खत विक्रीसह शेतकऱ्यांना विविध कृषी सेवा, मार्गदर्शन व इनपुट्स उपलब्ध करून देण्याचा हेतू असून, या माध्यमातून खत वितरणाचे व्यवस्थापन अधिक पारदर्शक व कार्यक्षम होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील खत विक्री करणाऱ्या विद्यमान सहकारी सोसायट्यांना प्राधान्याने ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. भविष्यात खत विक्री सुरू करू इच्छिणाऱ्या नव्या सहकारी संस्थांसाठीही हे नोंदणी प्रमाणपत्र अनिवार्य राहील.



विशेष म्हणजे, सहकारी सोसायट्यांना १५१ विविध प्रकारच्या व्यावसायिक उपक्रमांची परवानगी सरकारने दिली आहे. कृषी सेवांपासून ग्रामीण विकास, किरकोळ विक्री, लघुउद्योग अशा विविध क्षेत्रात या संस्थांना व्यवसाय विस्ताराची मुभा मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर पीएमकेएसके नोंदणीमुळे खत विक्रीचा व्यवसाय अधिक शिस्तबद्ध होणार असून, संस्थांना कृषी क्षेत्रात नवे प्रयोग करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. खत विक्री करणाऱ्या सहकारी संस्थांना आधुनिक सोयीसुविधांसह सुसज्ज गोदामे उभारण्यासाठी वर्ल्ड बँकेकडून विशेष अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या कर्जातून गोदाम बांधल्यास खताचा साठा व्यवस्थापन, गुणवत्तेचे संरक्षण आणि वेळेत वितरण या बाबींना मोठी चालना मिळणार असल्याचे सहकार विभागाचे म्हणणे आहे. अनेक सोसायट्यांना वाढत्या मागणीमुळे गोदामांची आवश्यकता भासत असल्याने ही योजना अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.

खत विक्री करणाऱ्या तसेच या व्यवसायात उतरू इच्छिणाऱ्या संस्थांनी तातडीने पीएमकेएसके नोंदणीची प्रक्रिया पूर्ण करावी, अन्यथा खत विक्रीवर निर्बंध लागू शकतात, असा इशाराही विभागाने दिला आहे. यामुळे सहकारी संस्थांना प्रशासनाशी सुसंगत राहून कृषी क्षेत्रातील योगदान वाढवण्याची संधी मिळणार आहे.

# जि. प. शाळांमध्ये सुरक्षा उपायांची चौकशी मुलं किती सुरक्षित?

### संकेतस्थळावर नमूद माहितीचा आढावा: शिक्षण विभागाचे निर्देश, जिल्ह्यात अंमलबजावणी!

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८अमरावती -** बदलापूर येथील घटनेनंतर विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेसंदर्भातशाळांमध्ये विविध उपाययोजना कान त्या उपायांची नोंद शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर करण्याच्या सूचना शाळांना देण्यात आल्या होत्या. शाळांनी संबंधित माहिती संकेतस्थळावर अद्ययावतही केली आहे. आता या पार्श्वभूमीवर १ ते १८ डिसेंबरदरम्यान जिल्ह्यात शाळा तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने १० ऑक्टोबर २०२५ रोजी सुमोटो जनहित याचिकेवर दिलेल्या आदेशानुसार, सर्व शाळांनी विद्यार्थी सुरक्षिततेसंबंधी उपाययोजनांची माहिती शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर अद्ययावत करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या निर्देशांच्या अनुषंगाने शिक्षण संचालनालयाने सर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना आवश्यक ती माहिती तत्काळ अद्ययावत करण्याच्या तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षा उपाययोजनांची तपासणी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना २८ नोव्हेंबर रोजीच दिल्या आहेत. संचालनालयाच्या पत्रानंतर जिल्ह्यातील सर्व शाळांमध्ये सुरक्षा उपाययोजनांची पडताळणी करण्याचे काम वेगाने सुरू झाले आहे. केंद्रप्रमुख, पर्यवेक्षक, गटशिक्षणाधिकारी तसेच प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाधिकारी यांच्याकडून जिल्हाभरात शाळांची तपासणीअसून विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची अंमलबजावणी प्रत्यक्षात कितपत झाली आहे, याची पाहणी केली जात आहे.



**आता त्याची प्रत्यक्ष तपासणी होणार!-** राज्य शासनाच्या आदेशानुसार प्रत्येक शाळेमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी उपाय योजना करणे बंधनकारक आहे. कोणत्या शाळांनी यातील किती उपाय योजनांची अमलबजावणी केली. त्याची प्रत्यक्ष तपासणी आता होणार आहे.

**कोण करणार तपासणी?**

शिक्षण संचलनालयाच्या आदेशानुसार केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, पर्यवेक्षक, गट शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी व इतर क्षेत्रीय अधिकारी यांनी प्रत्यक्ष भेट देऊन विद्यार्थी सुरक्षिततेसंदर्भात शासन निर्णयाच्या अंमलबजावणीचा आढावा घेणार असून, शालेय शिक्षण विभागाच्या संकेतस्थळावर प्रलंबित शाळांची माहिती अद्ययावत करणार आहेत.

**काय काय होत्या उपाययोजना ?-** शाळेत सीसीटीव्ही कॅमेरे, कर्मचाऱ्यांची पडताळणी, पोक्सो अत्याचारविषयक तक्रारींसाठी तक्रार बॉक्स, शाळेच्या दर्शनी भागांत टोल फ्री चाइल्ड हेल्पलाइन क्रमांक, विद्यार्थ्यांसाठी सुरक्षिततेबद्दलच्या माहितीचे फलककिंवा डिजिटल बोर्ड, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसोबत बैठक घेऊन आवश्यक उपाययोजना.

#### पालकांना ही घेता येणार माहिती!

-शाळेतील सुरक्षा उपाय योजनांची माहिती उपलब्ध करण्यासाठीhttps://education.maharashtra.g ov.in/ school/users/studentSecu rity Public हे स्वतंत्र अधिकृत संकेतस्थळ शिक्षण विभागाने सुरू केले असून, या संकेतस्थळाला भेट देऊन पालकांना राज्य सरकारने बंधनकारक केलेल्या उपाययोजनांची शाळांकडून अंमलबजावणी केली जात आहे की नाही, पाहता येणर आहे.

# धुक्याच्या सावटाखाली अमरावती विमानसेवा ठप्प

## अलायन्स एअरचा एकतर्फी निर्णय, लोकप्रतिनिधींची चुप्पी,नागरिकांचा संताप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

अमरावतीत एवढे 'अजुबे' दिसतात की अंबानगरीपेक्षा अमरावतीचे नवा 'अजुबानगरी' नाव ठेवले तर अधिक योग्य ठरेल. अमरावतीमध्ये दाट धुके पडणार, असे कारण सांगून अमरावती ते मुंबई विमानसेवा १७ डिसेंबरपर्यंत बंद आहे. मात्र हे धुके अदृश्य आहे. अमरावतीतमधील धुके अमरावतीमधील लोकांना दिसत नाही, पण हजारो किलोमीटर अंतरावर बसलेल्या अलायन्स एअरच्या अधिकाऱ्यांना मात्र पहिलेच अमरावतीमधील धुके दिसले. विशेष म्हणजे नागपूरमधील प्रादेशिक हवामान केंद्राने अमरावतीमध्ये खूप चांगली दृश्यमानता नोंदवली आहे. यावरून अमरावतीतील हवामान स्पष्ट आहे आणि सकाळी ९ वाजता अमरावतीत चक्क सूर्यप्रकाश आहे, हे वास्तव आहे. त्यामुळे निर्णय घेणाऱ्या अलायन्स एअरलाईनच्या




डोळ्यासमोरच दाट धुक्याचा पडदा आल्याची चर्चा आहे. मात्र असे असताना अमरावतीचे लोकप्रतिनिधी नेहमीप्रमाणे सार्वजनिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करत एकमेकांचे पाय ओढण्यात व्यस्त असल्याचे दिसून येते.

उल्लेखनीय असेकी, गेल्या आठदिवसांपासूनअमरावतीच्या बेलोरा विमानतळावरून मुंबईला जाणारी विमानसेवा धुक्यामुळे बंद करण्यात आलीआहे. आता अमरावतीवासीयांना प्रश्न पडत आहे की ते सकाळी ८ वाजल्यापासून त्यांच्या अंगणात चक्क सूर्य प्रकाश असतो... आणि काही जण तर थंडीचे दिवस असल्यामुळे कोवळ्या उन्हात सुद्धा बसतात. तरीही बेलोरा विमानतळावर सकाळी ८:४५ वाजता उतरणारी आणि मुंबईला सकाळी ९:१५ वाजता निघणारी विमानसेवा धुक्यामुळे बंद आहे, हे एक न उलगडाणारे कोडे आहे ?

गेल्या अनेक दिवसांपासून, अमरावतीतील मॉर्निंग वॉकर्सनी धुक्याबद्दल तक्रार केलेली नाही. आतापर्यंत, अमरावतीतील धुक्याचा एकही व्हिडिओ व्हायरल झालेला नाही. शिवाय, सरकारच्या स्वतःच्या हवामान खात्याच्या वेबसाइटवर अमरावतीमध्ये चांगली दृश्यमानता आणि स्वच्छ हवामान नोंदवले जात आहे, परंतु अलायन्स एअर हजारो किलोमीटर अंतरावरून बेलोरा विमानतळावर धुके पाहत आहे.

### विश्वासाचा करार तोडला

अलायन्सएअरने अमरावती-मुंबई विमानसेवा १७ डिसेंबरपर्यंत एकतर्फी रद्द केली. सरकार आणि कंपनीमध्ये असा लेखी करार झाला होता की अलायन्स एअर नियमित अमरावती-मुंबई उड्डाणे सुरू ठेवेल, परंतु धुक्याच्या आडून अलायन्स एअरने विश्वासाचा हा करार मोडला आहे.

### लोकप्रतिनिधी मात्र गप्प

अमरावती-मुंबई विमानसेवा गेल्या ८-१० दिवसांपासून बंद असून पुढील ९-१० दिवसही निलंबित राहील. यामुळे ज्यांनी आधीच मुंबई प्रवासाचे नियोजन केले होते त्यांना गैरसोय होत आहे. अमरावतीतील सर्व लोकप्रतिनिधी या सार्वजनिक समस्येबद्दल उदासीन दिसतात. हे तेच प्रतिनिधी आहेत जे प्रत्येक छोट्या गोष्टीवर गोंधळ घालतात आणि एकमेकांचे पाय ओढतात. पण जेव्हा सार्वजनिक समस्या सोडवण्याचा विचार येतो तेव्हा हेच प्रतिनिधी गप्प बसतात हे विशेष.

# अपघात रोखण्यासाठी वाहन चाचणी कडक - राज्यात नवे निर्देश जारी

## मार्गदर्शक तत्त्वांची पायमल्ली करणाऱ्या प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांवर होणार कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

राज्यातील वाढत्या रस्ते अपघात आणि मृत्यूंच्या प्रमाणावर नियंत्रण आणण्यासाठी परिवहन आयुक्त कार्यालयाने कायम अनुज्ञप्ती (लायसन्स) देताना वाहनचालक चाचणी प्रक्रिया अधिक कठोर करण्याचे निर्देश जारी केले आहेत. या मार्गदर्शक तत्त्वांची पायमल्ली करणाऱ्या प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांवर (ठढज) कारवाई केली जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

राज्यातील तब्बल ८० टक्के अपघात हे वाहनचालकांच्या निष्काळजीपणामुळे होत असल्याचे समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर 'स्वयंचलित ड्रायव्हिंग चाचणी ट्रॅक' प्रकल्प लवकरच राबविण्याचे सरकारने निश्चित केले आहे. हा प्रकल्प सुरू होईपर्यंत वाहनचालक चाचणी प्रक्रियेला अधिक कडक चौकट दिली जावी, यासाठी ३ डिसेंबर रोजी राज्यातील सर्व ठढज कार्यालयांना नवीन मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे आदेश देण्यात आले.

कायम अनुज्ञप्तीसाठी चाचणी उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांपैकी ५ टक्के अर्जदारांची दररोज पुनर्चाचणी घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या पुनर्चाचणीत अनुत्तीर्ण झालेल्यांची पुढील काळात पुन्हा चाचणी होईल. सर्व अहवाल दर महिन्याच्या अखेरीस वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक राहील.



### नवीन आदेशानुसार –

मोटार वाहन निरीक्षक व सहाय्यक निरीक्षकांनी चाचणीपूर्वी उपस्थिती नोंदवणे अनिवार्य आहे.

ऑनलाईन अपॉइंटमेंटच्या आधारे, उपप्रादेशिक परिवहन अधिकारी प्रत्येक निरीक्षकास ६० उमेदवारांचे वाटप करतील.

ड्रायव्हिंग स्कूलमार्फत येणाऱ्या उमेदवारांची चाचणी त्यांच्या शाळेच्या वाहनावरच घेण्यात येईल.

संबंधित वाहनाची कागदपत्रे तपासणे बंधनकारक असेल.

चाचणीत अनुत्तीर्ण उमेदवारांचे प्रमाण १० टक्क्यांपेक्षा कमी असल्यास, त्या अधिकाऱ्याच्या कामाचे पुनर्विलोकन होईल. अनुचित बाब आढळल्यास कार्यालय प्रमुखावर जवाबदारी निश्चित केली जाईल.

वाहन चाचणी प्रक्रिया कठोर व पारदर्शक केली आहे. कायम अनुज्ञप्ती मिळालेल्या ५ टक्के उमेदवारांची पुनर्चाचणी बंधनकारक असेल.

**विवेक भिमनवार, परिवहन आयुक्त**

# माझ्याशी लग्न न केल्यास बदनामी करणार

# लग्नाच्या कागदपत्रांवर जबरदस्तीने स्वाक्षरी

## मॅरेज ब्युरोच्या परिसरात घटना, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

– कोर्ट मॅरेज ब्युरोमध्ये एका युवतीवर विवाहासाठी दबाव, धमक्या आणि जबरदस्तीने लग्नाच्या कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यास भाग पाडल्याचा एक गंभीर गुन्हा उघड झाला आहे. रविवारी पीडितेने दाखल केलेल्या तक्रारीवरून गाडगे नगर पोलिसांनी दोन आरोपींविरुद्ध विविध कलमांखाली गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.माहितीनुसार, १७ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजताच्या सुमारास पीडिता तिच्या घरी होती तेव्हा तिला आरोपी सचिन इंगळेचा फोन आला. त्याने तिला ताबडतोब ऑटो घेऊन न्यायालयाजवळपोहोचण्यास सांगितले. कारण विचारले असता, सचिन म्हणाला की तो ठिकाणी पोहोचल्यानंतर तिला सांगेन. जेव्हा महिला न्यायालय परीसरात आली तेव्हा आरोपी सचिन आणि दुसरी महिला देखील तिथे उपस्थित होती. त्याच क्षणी सचिन इंगळेने पीडितेला सांगितले, चल आत्ताच आपण दोघे कोर्टात लग्न करूया, तुझ्या पालकांनाही कळणार नाही. त्यानंतर त्याने पीडितेला पाण्याची बाटली दिली. शिवाय,सचिन इंगळे आणि वकिलाच्या उपस्थितीत, तिला लग्नाशी संबंधित फॉर्मवर सही करण्यास भाग पाडण्याचा प्रयन करण्यात आला. पीडितेने स्पष्ट नकार दिल्यावर, विवाह ब्युरो प्रमाणपत्रावर सचिन इंगळेने तिचा हात धरला, तिला जबरदस्तीने सही केली व तिचा विनयभंग केला. एवढेच नाही तर आरोपीने धमकी दिली, जर तू माझ्याशीलग्न केले नाहीस तर मी तुझी बदनामी करेन. तो तिच्यावर दबाव टाकत राहिला आणि धमकी देत राहिला. त्यानंतर पीडितेने रविवारी गाडगे नगर पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

# अकोलीत क्रीडा संकुल उभारणीसाठी ३० कोटींची मागणी

## तुषार भारतीयांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**विदर्भ प्रजासत्ताकदि.९अमरावती** , फिट इंडिया मोहिमेच्या प्रेरणेने अमरावती शहरात क्रीडासुविधा वाढविण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. साईनगर प्रभागातील महाराष्ट्र गृहनिर्माण संस्थेकडून महानगरपालिकेला हस्तांतरित झालेल्या मौजे अकोली सर्वे क्रमांक ७ मधील ४.०७ हेक्टर विस्तीर्ण मैदानावर अत्याधुनिक क्रीडा संकुल उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

या संदर्भात तुषार भारतीय यांनी थेट मुख्यमंत्री यांना पत्र पाठवून ३० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याची विनंती केली आहे. त्यांनी नमूद केले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या फिट इंडिया संकल्पनेतून प्रेरणा घेऊन नागरिकांमध्ये आरोग्यजागर निर्माण करणे, सामाजिक ऐक्य दृढ करणे आणि खेळांच्या माध्यमातून सक्षम, निरोगी व सबल भारत घडविणे आवश्यक आहे. अमरावती शहरातील मोठ्या प्रमाणावरील तरुणाईसाठी अशी क्रीडासुविधा अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी पत्रात म्हटले आहे.



प्रस्तावित प्रकल्पामुळे स्थानिक पातळीवरील क्रीडा कौशल्य वाढीस लागून विविध क्रीडा स्पर्धांना चालना मिळेल, असेही मत व्यक्त करण्यात आले आहे. त्यामुळे मौजे अकोली सर्वे क्र. ७ येथील मैदान विकासासाठी तातडीने निधी मंजूर करावा, अशी मागणी आता वेगाने पुढे येत आहे.




# महापालिकेचा निर्णय : गांधी चौक पार्किंगचे कंत्राट माजी नगरसेवकाच्या भावाकडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती**

महापालिकेचे उत्पन्न वाढविण्यासाठी गांधी चौकातील वाहनतळाचा कंत्राटदार नुकताच बदलविण्यात आला. पूर्वी हा कंत्राट एकविरा देवी संस्थानकडे होता, मात्र आता तो कंत्राट त्याच प्रभागातील माजी नगरसेवकाच्या भावाला दिल्याची माहिती बाजार परवाना विभागाकडून देण्यात आली. त्याचा फायदा महापालिकेला होणार असून मनपाच्या वार्षिक उत्पन्नात वाढ होणार आहे. गांधी चौकातील । वाहनतळापासून मनपाला वार्षिक ४ लाख ५० हजार रुपये प्राप्त होतील.

महानगरपालिकेला मालमत्ता करासोबत अनेक विभागाकडून वार्षिक उत्पन्न मिळते. त्यापैकी एक विभाग म्हणजे बाजार परवाना विभाग आहे. वार्षिक उत्पन्न वाढविण्यासाठी बाजार परवाना विभागाकडून तीन महिन्यापूर्वी गांधी चौकातील वाहनतळाची निविदा काढण्यात आली. १५ वर्षापासून हा कंत्राट एकविरा देवी संस्थानकडे होता. तेव्हा महापालिकेला नाममात्र ८० हजार



रुपये वार्षिक उत्पन्न प्राप्त होत असायचे. आता मात्र निविदा काढून महापालिकेने जणू उत्पन्नात वाढ केली. निविदा प्रक्रियेत फक्त तीन जणांनी हिस्सा घेतला आणि तो कंत्राटत्याच प्रभागाचे माजी नगरसेवक यांच्या भावाला देण्यात आला. हा कंत्राट एकदम १० वर्षाकरिताच देण्यात आला. तसेच यासंदर्भात महापालिकेने जाहीरात प्रसिध्द करुन निविदा प्रक्रिया केली मात्र केवळ तीन जणांनीच या निविदा प्रक्रियेत सहभाग घेतला आणि मनपाने कंत्राटदारसुध्दा निश्चित केला. त्यामुळे या संपूर्ण निविदा प्रक्रियेवर आक्षेप घेतले जात आहेत. विशेष म्हणजे या निविदा प्रक्रियेत एकविरा देवी संस्थानने सुध्दा सहभाग घेतला होता. तीन ते साडे तीन हजार स्केअर फुटखुला भुखंड असून ती जागा महापालिकेच्या मालकीची आहे. कॉर्नर पीस भूखंड असल्याने या ठिकाणी वाहनतळाला दोन द्वार आहे. त्यापैकी पूर्वकेडीलुद्वार हे बंद करण्यात आले असून उत्तर दिशेचा दरवाजा खुला आहे. निविदा प्रक्रियेनुसार जरी हा कंत्राट माजी नगरसेवकाच्या भावाला देण्यात आला असला तरी बाजार परवाना विभागानुसार हस्तांतरणाची प्रक्रिया अद्याप झालेली नाही. या ठिकाणी फोर व्हीलर, टू व्हिलरच नव्हे तर ट्रॅव्हल्ससुध्दा पार्किंग करण्याची सुविधा आहे.

# ड्रग्ज तस्करांची टोळी शहरातून फरार

## पोलिसांचे युद्धस्तरावर सुरू आहे सर्च ऑपरेशन

**विदर्भ प्रजासत्ताकदि.९अमरावती –** क्राईम ब्रांचने रविवारला ड्रग्ज तस्करी करणाऱ्या दोघांना हायेवरून अटक केली होती. या आरोपींकडून एकूण ६९ ग्रॅम एमडी जप्त करण्यात आले. आरोपींची चौकशी केल्यानंतर पोलिसांनी एकूण १० आरोपींविरुद्ध गुन्हा दाखलकेला. त्यानंतर पोलिस तपास सुरू होताच, ड्रग्ज तस्करांची टोळीच शहरातून पळून गेल्याचे वृत्त आहे. दरम्यान, क्राईम ब्रांचचे पोलिस निरीक्षक संदीप चौहान यांच्या नेतृत्वाखाली, शोध मोहीम सुरू केली आहे. फरार आरोपींचा युद्धपातळीवर शोध सुरू आहे.रविवार, ७ डिसेंबर रोजी दुपारी क्राईम ब्रांचने राष्ट्रीय महामार्गावर दुचाकीस्वार मो. सोफियान मो. मन्नान (२४) आणि शोएब खान समीर जाम (२४) यांना अटक केली होती. झडती दरम्यान त्यांच्याकडून अंदाजे ६,८२,००० रुपये किंमतीचे ६९ ग्रॅम एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले.कठोर चौकशी केल्यानंतर, दोन्ही आरोपींनी शहरातील अनेक ड्रग्जतस्करांची नावे उघडकेली. पोलिसांनी अटकेतील दोन



आरोपींसह एकूण १० आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला. आरोपी सैय्यद अल्तमश सैय्यद गफ्फार, गोलू कबीर, आवेज कुरेशी आरिफ कुरेशी, साकिब कुरेशी उर्फ हग्या, आकीब कुरेशी, शेख नईम उर्फ राजा/होंगा, शेख नाजिम शेख रहीम उर्फ होंगा और शेख सोनू शेख रहीम यांचा समावेश आहे. सोमवारी, पोलिसांनी या फरार आरोपींचा शोध सुरूकेला असता ड्रग्ज तस्करी करणारी टोळी शहरातून पळून गेली आहे. परिणामी, गुन्हे शाखेने आता सर्व फरार आरोपींविरुद्ध शोध मोहीम सुरू केली आहे, त्यांचा ठावठिकाणा तपासला आहे. अटक केलेल्या दोन्ही आरोपींना सोमवार, ८ डिसेंबर रोजी न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांना दोन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले.

### धामणगाव रेल्वेत स्ट्रॉंगरूमला

# एसआरपी, नगरपालिका कर्मचारी व पोलिसांचा २४ तास खडा पहारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९धामणगाव रेल्वे**

नगरपालिकेच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी मंगळवारी मतदान झालेल्या सर्व मशीन वीस दिवसांसाठी स्ट्रांगरूममध्ये सीलबंद झाल्या आहेत. या स्ट्रॉंगरूमला एसआरपी, नगरपालिका कर्मचारी व पोलिसांचा २४ तास खडा पहारा ठेवण्यात आला आहे. त्यांच्या जोडीला सीसीटीव्हीच्या मअध्यमातून चौफेर नजर ठेवण्यात आली आहे.येथील नगरपालिका निवडणुकीसाठी मंगळवारी ६७.२ टक्के मतदारांनी मतदान केले. धामणगावात २१ मतदान केंद्रांवर मतदान झालेली सर्व




मतदान यंत्रे निवडणूक निरीक्षक, निवडणूक निर्णय अधिकारी, पोलिस अधिकारी, उमेदवार व उमेदवारांचे प्रतिनिधी यांच्या समक्ष दृढकक्ष सील करून पोलिस प्रशासनांच्या ताब्यात देण्यात आला. मतमोजणीची तारीख पुढे ढकलल्यामुळे दृढ कक्षाला कडक सुरक्षा व्यवस्थाकरावीलागली आहे. त्या ठिकाणी २१ तारखेपर्यंत राज्य राखीव पोलिस दलाचे दहा सशस्त्र कर्मचारी कायमस्वरुपी तैनात करण्यात आले आहेत.

त्यांच्या जोडीला स्थानिक पोलिस प्रशासनातील प्रत्येक ४८ तासांसाठी आठ पोलिसांचा २४ तास खडा पहारा ठेवण्यात आला आहे. त्यांच्या जोडीला नगरपालिकेचे प्रत्येक आठ तासाला दोन असे २४ तासांत तीन शिफ्टमध्ये सहा कर्मचारी देण्यात आले आहेत.

### अशी आहे सुरक्षा व्यवस्था

पोलीस अधिकारी - चार
सीसीटीव्ही-चार
सशस्त्र एसआरपी-१०
सशस्त्र पोलिस-१०
नगरपालिका कर्मचारी-६

# दोन महिन्यात बाजार समितीत धान्याची विक्रमी आवक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अचलपूर–** स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीत २ महिन्यात ५ लाख ८० हजार पोत्यांची विक्रमी आवक झाली आहे. त्यामध्ये सर्वाधिक ४ लाख ९१ हजार ६५७पोत्यांची आवक मक्याची आहे. त्याखालोखाल सोयाबीन, गहू, तूर, ज्वारी आणि हरभऱ्याची आवक आहे. उल्लेखनीय म्हणजे सदर आवक ही केवळ २ महिन्यांची आहे. बाजार समितीमध्ये ऑक्टोबर महिन्यापासून मक्याची मोठ्या प्रमाणात आवक सुरू झाली. एकूण ४ लाख ९१ हजार ६५७ पोत्यांची आवक केवळ २ महिन्यांत झाली. १ हजार ५०० रु. प्रति क्विंटल सरासरी भाव मक्याला मिळाला. त्याखालोखाल सोयाबीनचे दर एकरी उत्पन्न घटले. तरीसुद्धा याच कालावधीत ५१ हजार पोते शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणले. सोयाबीनला सरासरी भाव प्रति किंटल ४ हजार रूपये इतका मिळाला. सोयाबीनला शासकीय हमीभाव ५ हजार रुपयापेक्षा जास्त असल्याने बहुतांश शेतकऱ्यांनी सोयाबीन हमीभावावर शासनाला विकली. त्यामुळे तुलनेत बाजारसमितीमध्ये सोयाबीनची आवक कमी झाल्याचे समजते. बाजारात गव्हाचीसुद्धा चांगली आवक राहिली. १५ हजार ५६१ पोते सरासरी भाव २ हजार ५७५, तूर ११ हजार ३०२ पोते सरासरी भाव ६ हजार ५००, हरभरा ३ हजार ४२५ पोते सरासरी भाव ५ हजार १०० प्रतिक्विंटल, ज्वारी ५ हजार ५०८ पोते सरासरी भाव १ हजार ५०० रु. प्रति क्विंटल याप्रमाणे आवक झाली असून याप्रमाणे शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळाला आहे.

# अमृतच्या जिल्हा कार्यालयाचे बुधवारी उद्घाटन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९अमरावती–** खुल्या गटातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी कार्यरत 'अमृत या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या जिल्हा कार्यालयाचे उद्घाटन बुधवार, दि. १० डिसेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता होणार आहे.

सदर कार्यालय अमृत कार्यालय, आशीर्वाद बिल्डिंग, मालटकेडी समोर, बस स्टँड रोड, टोपे नगर, अमरावती येथे स्थित आहे. संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांच्या हस्ते कार्यालयाचे उद्घाटन होणार आहे. विशेष कार्यकारी तथा प्रबंधक संचालक सिद्धेश्वर वरणगावकर, राज्य व्यवस्थापक दीपक जोशी, नाशिक विभागीय व्यवस्थापक मंगेश खाडीलकर, अमरावती विभाग व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटूरवार उपस्थित उपस्थित राहतील.

जिल्हा कार्यालयामुळे संस्थेच्या विविध उपक्रमांचा लाभ नागरिकांना अधिक सुलभपणे मिळणार असून रोजगार निर्मितीला नवी दिशा मिळणार आहे. महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) ही संस्था राज्यात कौशल्य विकास, प्रशिक्षण, मार्गदर्शन आणि रोजगारसंधी निर्माण करण्यासाठी कार्यरत आहे. युवकांनी औद्योगिकदृष्ट्या शैक्षणिक आणि व्यवसायिकदृष्ट्या सक्षम व्हावे, यासाठी अमृत उपक्रम राबवित आहे.

जिल्हा कार्यालय सुरू झाल्यानंतर स्थानिक पातळीवर अधिक कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. विविध उपक्रमांची अंमलबजावणी जलद गतीने होईल. या कार्यालयामुळे प्रशिक्षण, प्रमाणपत्र अभ्यासक्रम, कौशल्य विकास, स्वयंरोजगार, उद्योग उभारणी यासारख्या अनेक संधी उपलब्ध होतील.

# सहा हजार अंडी, १३० किलो मटण हिवाळी अधिवेशन की फूड फेस्टिवल?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नागपूर**

उपराजधानीत हिवाळी अधिवेशन म्हणजे राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या खास पाहुण्यांसाठी पर्वणीच. थंडीचे दिवस असल्याने खाण्यापिण्याची चंगळ आणि शनिवार, रविवार सुटी असल्याने विदर्भातील व्याघ्रदर्शनाचा लाभ. यंदा मात्र थंडी चांगलीच कडाक्याची आणि त्यातून शनिवारी, रविवारी कामकाज ठेवल्यामुळे व्याघ्रदर्शनाचा बेत पुरता फसलाय. मात्र, यंदा या पाहुण्यांसाठी खान्यापिण्याची चांगलीच चंगळ. अर्थताच उपराजधानीतील हिवाळी अधिवेशन सुरू होताच आमदार निवासातील कँटीननेही 'भोजन महोत्सवा'ची तयारी पूर्ण झाली आहे. रविवारपासून येथे दररोज तीन हजारांहून अधिक लोकांसाठी जेवण सुरू झाले आहे. मात्र, त्यापेक्षाही चर्चा होतेय ती खवय्यांचे लाड पुरवण्यासाठी असलेल्या साहित्यसाठाची.



एक-दोन नाही तर तब्बल सहा हजार अंडी, १३० किलो मटण आणि एवढेच नाही तर मोठ्या प्रमाणात कडधान्य, भाज्या आणि नाश्त्याचे साहित्य या सर्वांचा तगडा साठा तयार ठेवण्यात आला आहे. आमदार, त्यांचे सहकारी, पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि सुरक्षा दलातील जवान-अशा मोठ्या गर्दीची भूक भागवण्यासाठी हे किचन २४ तास धावते आहे.

शाकाहारी मेन्यूमध्ये नागपुरी थाटात झुणका-भाकर, पिठलं, वांग्याचं भरीत, तिखट-गोड दाल, स्पेशल सावजी रस्सा यंदा खास आकर्षण आहे. याशिवाय पालक-पनीर, मेथी-लसूण, झुणका, मिक्स व्हेज, डाळ तडका, पोळी-भाकरी आणि भात यांचाही समावेश यंदाच्या जेवणात असून, रोजच्या जेवणात 'घरगुती चवीचा' अनुभव देण्याचा प्रयत्न आहे. ब्रेकफास्ट मध्ये दक्षिणेचा तडका आहे. म्हणजेच इडली, डोसा, उत्तपम, उपमा, आलू पोहा, चना-रसा, तसेच ऑम्लेट-ब्रेड अशी लज्जतदार पदार्थांची मेजवानी सकाळी ६ ते ११ आणि संध्याकाळी ४ ते ७ यावेळेत उपलब्ध आहे.

हिवाळी अधिवेशनामुळे सुरक्षा व्यवस्थाही सज्ज झाली असून, आमदार निवासाच्या प्रवेशद्वारावर पोलिसांची सतत नजर आहे. एकूण ४०० कर्मचारी कँटीनच्या स्वयंपाकापासून सर्व्हिस, स्वच्छता आणि व्यवस्थापनापर्यंत सर्व कामे सुरळीत पार पाडत आहेत. आमदारांच्या स्वागतात कोणतीही कमतरता राहू नये, यासाठी स्वच्छता, सुरक्षा आणि व्यवस्था यामध्येही विशेष लक्ष देण्यात आले आहे. निवासातील खोल्यांची विशेष देखभाल, भोजनालयाची व्यवस्था, वाहनतळापर्यंतच्या मार्गाची दुरुस्ती यासह सर्व तयारी पूर्ण झालेली आहे. अधिवेशन काळात आमदारांची सतत ये-जा, लोकप्रतिनिधींची वर्दळ या सर्वांमुळे आमदार निवास परिसरात नेहमीच उत्साहाचे वातावरण असते.

# सुसंस्कृत, जबाबदार आणि सक्षम विद्यार्थी घडवणे हे महाविद्यालयाचे ध्येय - प्रविण पोटे पाटील

## पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयात पालक सभा संपन्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**




महाविद्यालयात शिक्षण घेणारा प्रत्येक विद्यार्थी सुसंस्कृत आणि जबाबदार नागरिक बनला पाहिजे तसेच अभियांत्रिकीसोबतच आयएएस, आयपीएस, सायंटिस्ट अशा विविध क्षेत्रांतही विद्यार्थी देशसेवा करण्यास सक्षम व्हावेत, हेच आमचे ध्येय आहे. त्याचप्रमाणे महाविद्यालयाचे देश-विदेशातील नामांकित बहुराष्ट्रीय कंपन्यांसोबत करार झाले असून स्वायत्त दर्जा प्राप्त झाल्यामुळे इंडस्ट्रीच्या गरजांनुसार अभ्यासक्रम तयार करण्याचे स्वातंत्र्य मिळाले आहे. विद्यार्थ्यांना अत्याधुनिक रिसर्च सेंटर, प्रयोगशाळा आणि इंडस्ट्रीतील आधुनिक प्रोजेक्टवर काम करण्यासाठी आवश्यक सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार असून, यामुळे त्यांचे कौशल्य वृद्धिंगत होऊन प्लेसमेंटच्या संधी अधिक वाढणार असल्याचे मत पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयाच्या बीटेक, एमबीए, एमसीए प्रथम वर्षाला असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित पालक सभेत संस्थाध्यक्ष मा.आ. श्री प्रविण पोटे पाटील यांनी व्यक्त केले.

सभेची सुरुवात संस्थेचे अध्यक्ष मा. आ. प्रविण पोटे पाटील, उपाध्यक्ष श्रेयसदादा पोटे पाटील, संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य मो. झुहेर, पालक प्रतिनिधी श्री विजय घुरव तसेच सर्व डीन आणि विभाग प्रमुख यांच्या हस्ते श्री संत गजानन महाराज यांच्या प्रतिमेला हारार्पण करून झाली.संस्थेचे संचालक डॉ. पी. एम. खोडके यांनी शिक्षक-पालक-विद्यार्थी या त्रिसूत्रीचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी पालकांना एनईपी शिक्षण प्रणालीचे फायदे सविस्तर समजावून सांगत विद्यार्थ्यांच्या प्रगतीत पालकांनी सक्रिय भूमिका घ्यावी, असे आवाहन केले. प्राचार्य डॉ. पी. एम. जावंधिया यांनी स्वायत्त महाविद्यालयाच्या वैशिष्ट्यांवर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धेसाठी सक्षम बनविण्याचा संकल्प व्यक्त केला.

पालक प्रतिनिधी विजय घुरव, श्री श्रीकांत विखे यांनी संस्थेतील शिस्तबद्ध वातावरण, अध्यात्मिकता, आधुनिक शिक्षणपद्धती, प्लेसमेंट प्रक्रिया, फॉरेन व डोमेस्टिक टूर अशा उपक्रमांची स्तुती केली.

या पालक सभेत महाविद्यालयात राबविल्या जाणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती पालकांना देण्यात आली. विद्यार्थी विविध क्लबच्या माध्यमातून कला, तंत्रज्ञान, संशोधन, व्यक्तिमत्त्व विकास आदी क्षेत्रांत काम करत असून यामुळे त्यांच्या बौद्धिक आणि सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळत असल्याचे सांगण्यात आले.कार्यक्रमाच्या शेवटी विविध स्पर्धांमध्ये विजयी झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. बी.टेक, एमबीए आणि एमसीए प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या मोठ्या संख्येने पालकांनी उपस्थिती दर्शवून कार्यक्रम यशस्वी केला.

# केंद्रप्रमुख पदावर टीईटी अनिवार्य होण्याची शक्यता प्रबळ सध्या कार्यरत केंद्र प्रमुखांनाही परीक्षा द्यावी लागणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**



राज्यातील शालेय शिक्षण व्यवस्थेत प्रमुख मानल्या जाणाऱ्या केंद्र प्रमुख पदासाठी आता टीईटी परीक्षा अनिवार्य करण्याची शक्यता अधिक स्पष्ट होत आहे. केंद्रप्रमुख पद हे व्यवस्थापकीय स्वरूपाचे असले तरी प्रत्यक्ष अध्यापनाशी ते थेट जोडलेले असल्याने उमेदवारांकडे अध्यापन पात्रता असणे आवश्यक आहे, असे विविध शिक्षण तज्ज्ञांचे मत आहे.

सध्याच्या नियमानुसार केंद्रप्रमुखांना आठवड्यातून किमान दहा तास प्रत्यक्ष अध्यापन करणे अनिवार्य आहे. त्यामुळे इतर शिक्षकांप्रमाणेच केंद्रप्रमुखांनाही टीईटी परीक्षा उत्तीर्ण करणे गरजेचे ठरते, असा मुद्दा आता मांडला जात आहे. तज्ज्ञांच्या म्हणण्यानुसार कोणताही अधिकारी बेट अध्यापन प्रक्रियेत सहभागी असणार असल्यास, त्याची अध्यापन पात्रता आणि शैक्षणिक गुणवत्ता परीक्षा द्वारे सिद्ध असणे ही शिक्षण व्यवस्थेची मूलभूत अपेक्षा आहे. तसेच सध्या कार्यरत केंद्रप्रमुखांनाही या परीक्षेतून जावे लागणार असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अध्यापनाशी थेट संबंध येत असल्याने जुन्या सेवाकाळाच्या आधारे सूट देण्याऐवजी समान निकष लागू करणे न्याय्य ठरेल, असे शिक्षण तज्ज्ञांचे म्हणणे आहे. राज्य शिक्षण विभाग या संदर्भात धोरणात्मक चर्चा करीत असून पुढील शैक्षणिक वर्षापासून या नियमांमध्ये सुधारणा होण्याची शक्यता आहे. यासंबंधीचा अंतिम निर्णय शालेय शिक्षण विभाग लवकरच जाहीर करेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शिक्षक व पालकवर्गाबरोबरच शैक्षणिक क्षेत्रातील सर्व घटकांचे या निर्णयाकडे आता लक्ष लागून राहिले आहे. या विरोधात नुकतेत राज्यव्यापी शाळा बंद आंदोलन करुन, मोर्चे, धरणे आंदोलन जिल्हाधिकारी कार्यालयावर काढले होते. आता शिक्षण विभागातील शिक्षकामधून किंवा थेट भरतीकरिता केंद्र प्रमुख यांना टिईटी लागू होण्याची शकता आहे. टिईटीच्या सक्तीला विरोध होणे आवश्यक आहे. तसेच टिईटी नाही म्हणून पदोन्नती नाकारणे चुकीचे आहे.

# ७५ हजार कोटींच्या पुरवणी मागण्या; आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी १५,६४८ कोटी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नागपूर**



राज्याची आर्थिक स्थिती अडचणीची, पण दिवाळखोरीकडे वाटचाल नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली असतानाच राज्य विधिमंडळात ७५ हजार २८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सोमवारी सादर करण्यात आल्या. यावरून राज्याचे वित्तीय नियोजन कोलमडल्याचेच लक्षण मानले जाते. आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी १५,६४८ कोटी तर महायुती सरकारच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी ६१०० कोटी रुपयांची तरतूद या मागण्यांमध्ये करण्यात आली आहे.

गेल्या वर्षी विधानसभा निवडणुकीआधी म्हणजे जून २०२४ मध्ये ९४,८८९ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या होत्या. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, शेतकऱ्यांना मोफत वीज यांसह अनेक योजनांची घोषणा केल्याने खर्च वाढला होता. आताही या लोकप्रिय योजनांवरील खर्च आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे विविध कामे, योजना व प्रकल्पांवरील खर्चात वाढ झाली आहे. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना अर्थसहाय्य, बियाणे व अन्य कामांसाठी सुमारे १५,६४८ कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली आहे.

तर नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्यासाठीच्या कामांसाठी तीन हजार कोटी रुपये देण्यात येणार आहेत. राज्याची २०२५-२६ साठी महसुली तूट ४५,८९१ कोटी रुपये, तर राजकोषीय तूट एक लाख ३६ हजार २३५ कोटी रुपये आहे. पुरवणी मागण्यांमध्ये खर्चात वाढ झाल्याने ही तूट वाढण्याची भीती आहे.

# हिवाळी अधिवेशनात प्रवेश पत्रिकांवर कडक निर्बंध; खासगी अभ्यागतांना प्रवेशबंदी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नागपूर**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनादरम्यान मुंबईतील विधानभवन परिसरात आमदारांच्या कार्यकर्त्यांमध्ये झालेल्या हाणामारीनंतर सुरक्षा व्यवस्थेबाबत गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले होते. याच पार्श्वभूमीवर आगामी हिवाळी अधिवेशनात विधानभवन परिसरात दिल्या जाणाऱ्या प्रवेश पत्रिकांवर कडक निर्बंध लादण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

राज्यमंत्री यांच्यासोबत येऊ शकणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या मर्यादित ठेवण्यात आली आहे. त्यांना केवळ खासगी सचिव, एक विशेष कार्य अधिकारी, एक स्वीय सहायक आणि एक चोपदार किंवा पर्यायाने दोन शिपाई यांनाच प्रवेश मिळणार आहे. त्यामुळे मंत्र्यांच्या मोठ्या कार्यकर्त्यांसह येणाऱ्या ताफ्यांवर नियंत्रण येणार आहे.मंत्रालयीन कामकाजासाठी येणाऱ्या विभागीय अधिकाऱ्यांकरिता जास्तीत जास्त ३० कर्मचारी या मर्यादेपर्यंतच प्रवेश पत्रिका देण्यात येतील. पूर्वी विभागीय कार्यालयांतून मोठ्या संख्येने कर्मचारी अधिवेशनाच्या काळात विधानभवनात येत असल्याने परिसरात विशेषतः महत्त्वाच्या चर्चांच्या दिवशी मोठी गर्दी होत असे. नव्या नियमांनंतर ही स्थिती आटोक्यात येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महत्त्वाचा बदल म्हणजे खासगी अभ्यागत यांना संपूर्ण अधिवेशन कालावधीसाठी दिले जाणारे पास पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत. यामुळे विधानभवनात अनधिकृत हालचाली आणि अनावश्यक वावर रोखला जाईल, असा विश्वास अधिकाऱ्यांचा आहे.यापूर्वी पीठासीन अधिकारी, उपपीठासीन अधिकारी, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विरोधीपक्ष नेते यांच्या कार्यालयीन कामकाजासाठी त्यांच्या मागणीनुसार प्रवेश पत्रिका सहज देण्यात येत होत्या. मात्र आता या वरिष्ठ नेत्यांच्या कार्यालयांनाही प्रवेशपत्रिका मागणीसाठी कठोर प्रक्रिया पाळावी लागणार आहे. विशेष कार्यकारी अधिकारी किंवा सचिव यांच्या लेखी शिफारशीशिवाय कोणालाही प्रवेशपत्रिका दिली जाणार नाही, असा स्पष्ट आदेश देण्यात आला आहे. विधान भवन परिसरातील अनावश्यक गर्दी टाळणे आणि कोणत्याही प्रकारच्या अप्रिय घटना रोखणे, हा या निर्णयामागील मुख्य उद्देश आहे.

# गुरुकुंजात अखिल भारतीय महिला व पुरुषांची कबड्डी स्पर्धा;तुकड्यादास क्रीडा मंडळाचे आयोजन

## महाराष्ट्रश्रची हास्यजत्रा अरुण कदम यांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**



तुकड्यादास क्रीडा मंडळाच्या वतीने स्व. गणेशराव ठाकरे व स्व. प्रविण लोखंडे, यांच्या स्मृतीप्रित्यर्थ अखिल भारतीय भव्य खुले कबड्डी सामने (महिला व पुरुष गट) आयोजित करण्यात आले आहे.हे सामने दिनांक १९, २०, व २१ डिसेंबर २०२५ रोजी गुरुकुंज मोझरी येथील अखिल भारतीय श्री. सेवामंडळच्या भव्य प्रागणात पार पडणार आहेत. अशी माहिती तुकड्यादास क्रीडा मंडळाचे संस्थापक अविनाश ठाकरे, यांनी तिवसा येथील शासकीय विश्रांमगृह येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेतुन दिली.या स्पर्धेचे उद्घाटन आ. संजय खोडके (विधानपरिषद) व आ. सुलभा खोडके, यांच्या शुभहस्ते होणार असून.कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' फेम प्रसिद्ध अभिनेते अरुण कदम, यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.दरम्यान प्रमुख अतिथी म्हणून जनार्दन पंत बोथे, सचिव - अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळ, राष्ट्रवादीच्या सुरेखा ठाकरे, संतोष महात्मे, दिलीप भुयार,प्रकाश पडोळे,प्रकाश मक्रमपुरे. तसेच गुरुदेव नगर, व मोझरीचे, सरपंच यांची विशेष उपस्थिती राहणार असून बक्षीस वितरण जिल्हाधिकारी, अमरावती तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी उपस्थित राहणार आहे.गुरुकुंज मोझरी, येथील अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवामंडळच्या प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या भव्य कबड्डी स्पर्धेदरम्यान महिला पुरुषांसाठी बसण्याची विशेष व्यवस्था करण्यात आली असून, या कबड्डी स्पर्धेत अमरावती, नागपूर, गोडीया,भंडारा, नाशिक, संभाजीनगर, अकोला,बुलढाणा, जळगाव, सोलापूर, कोल्हापूर,सातारा, यासह राज्यभरातून महिला व पुरुषाचे संघ, मोठ्या प्रमाणात सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

### युवा पिढीसाठी राष्ट्रीय व्यासपीठ



या स्पर्धेचा उद्देश ग्रामीण पातळीवरील खेळाडूंना राष्ट्रीय स्तरावरील व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि कबड्डी सारख्या भारतीय खेळाची ताकद गावागावात पोहोचवने हा आहे.मोठ्या संख्येने खेळाडू व नागरिकांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे, असे आवाहन तुकड्यादास क्रीडा मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

**अविनाश ठाकरे**

# किरीट सोमय्या विनापोस्ट काम करतात - चंद्रशेखर बावनकुळे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नागपूर**




भाजप नेते आणि माजी खासदार किरीट सोमय्या यांना भाजपने उमेदवारी न दिल्याने ते नाराज झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात होती. विशेष म्हणजे पक्षाने दिलेली जबाबदारी त्यांनी चोखपणे पार पडली, अनेक नेत्यांच्या घोटाळ्यावरुन कागदोपत्री पुरावे देत त्या नेत्यांना पोलीस आणि तपास यंत्रणांकडे पाठवलं. मात्र, भाजपने त्यांना ना तिकीट दिले, ना कुठली जबाबदारी. त्यामुळे, पक्षासाठी एवढं काम करुन किरीट सोमय्यांना कुठलेही पद नसल्याने ते नाराज असल्याची चर्चा होत आहे. त्याच अनुषंगाने भाजप नेते तथा मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर, किरीट सोमय्यांना पोस्ट घेऊन काम करण्यात इंटरेस्ट नसतो, ते विनापोस्ट काम करत असतात, असे बावनकुळे यांनी म्हटले.

भाजप नेते किरीट सोमय्या यांच्या नाराजीवर चंद्रशेखर बावनकुळे यांनी भूमिका मांडली. मागच्यावेळी सुद्धा किरीट सोमय्या यांना आम्ही पोस्ट घ्या म्हटलं होतं. मात्र, त्यांनी कुठलीही पोस्ट न घेता महाराष्ट्रभर फिरून पक्षाचे काम केलं. त्यांना पोस्ट घेऊन काम करण्यात इंटरेस्ट नसतो, ते विना पोस्ट ते काम करत असतात, असे चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटलं. मी पक्षाध्यक्ष असताना सोमय्यांना ज्या जबाबदाऱ्या दिल्या, त्या त्यांनी पूर्ण केल्या. त्यांनी जो विषय घेतला असेल ते काम ते पूर्ण करतात. मागच्यावेळी त्यांनी जन्माचे खोटे दाखले जे बांगलादेशी लोक घ्यायचे, रोहिंग्यांना जन्म प्रमाणपत्र द्यायचे. या प्रश्नावरुन त्यांनी राज्यात मोठी मोहीम राबवली असून ५० लक्षच्या वर डॉक्युमेंट त्यांनी शोधून काढले आहेत, राज्याच्या हिताचं काम त्यांनी केलंय, असेही बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# समाजसेवकांच्या थोर परंपरेतील मौलिक व्यक्तिमत्व हरपले - मुख्यमंत्री

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९नागपूर**

ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे.वंचित आणि असंघटित घटकांच्या हक्कांसाठी त्यांनी सातत्याने संघर्ष केला. त्यांचे आधारस्तंभ म्हणून काम केले, या शब्दात ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव यांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्रध्दांजली अर्पण केली.



हमाल, रिक्षाचालक, बांधकाम मजुरांना न्याय देण्यासाठी त्यांनी संघटन उभे केले. हमाल पंचायत, एक गाव-एक पाणवठा असे अनेक उपक्रम त्यांनी राबविले. सामाजिक कुप्रथांविरोधात त्यांनी दिलेला लढा हा कायम स्मरणात राहील. महाराष्ट्राला समाजसेवकांची एक थोर परंपरा कायमच लाभली. त्या परंपरेतील एक मौलिक व्यक्तिमत्व आज आपल्यातून निघून गेले. ते कायम स्मरणात राहतील, त्यांचे विचार येणार्या पिढ्यांना प्रेरणा देत राहतील.मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो.अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुख व्यक्त केल.

### संघर्षयोद्धा आज हरपला -अजित पवार

समाजकारणातील निस्पृहता, तळमळ आणि अत्युच्च प्रामाणिकतेचे प्रतीक असलेले ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. श्रमिक, कष्टकरी, दुर्बल आणि वंचित घटकांच्या हक्कांसाठी आयुष्यभर अहोरात्र झटणारा महान संघर्षयोद्धा आज हरपला, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्त करत ज्येष्ठ समाजसेवक बाबा आढाव यांना श्रद्धांजली वाहिली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोक संदेशात म्हणतात की, हमाल पंचायत, रिक्षा पंचायत, कागद-काचा वेचणाऱ्यांची संघटना अशा विविध संघटनांद्वारे लाखो कष्टकऱ्यांच्या आयुष्यात आशेचा किरण निर्माण करण्याचे कार्य बाबा आढाव यांनी केले.

विचारशील चळवळीचे अपरिमित नुकसान झाले असून महाराष्ट्राने समाजसेवेचा महान तपस्वी गमावला आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बाबा आढाव यांना श्रध्दांजली अर्पण केली आहे.

# नांदगाव पेठ परिसरात आढळला दुर्मिळ हरणटोळ साप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नांदगाव पेठ**

येथील बाळापुरे लेआउट परिसरात रविवारी अचानक एक दुर्मिळ हिरवा साप दिसल्याने परिसरातील नागरिक भयभीत झाले होते. नागरिकांनी तत्परतेने सर्पमैत्रीण संघटना पाटील यांच्याशी संपर्क साधला.संघटना पाटील यांनी सापाला पकडल्यानंतर तो हरणटोळ असल्याचे निश्चित केले. दुर्मिळ असणारा हरणटोळ हा साप निमविषारी असून माणसासाठी पूर्णपणे निरुपद्रवी आहे. मात्र उंदीर, बेडूक, सरडे अशा छोट्या प्राण्यांवर तो आपले भक्ष्य मिळवण्यासाठी विषाचा वापर करतो.

वाढती वृक्षतोड, रस्त्यावरचे विकासकाम, शेतीतील रासायनिक औषधे यांमुळे या प्रजातीचे नैसर्गिक अधिवास मोठ्या प्रमाणात कमी होत आहेत. त्यामुळे हरणटोळासह अनेक साप प्रजाती दुर्मिळ होत चालल्या आहेत. लोकांच्या अंधश्रद्धांमुळेही या सापांवर अनावश्यक हल्ले होत असल्याने त्यांची संख्या घटत आहे.जैवविविधतेच्या दृष्टीने हरणटोळ हा अत्यंत महत्त्वाचा साप आहे. परिसरातील उंदीर व सरपटणाऱ्या प्राण्यांचे प्रमाण नियंत्रित ठेवण्यात तो मोठी भूमिका बजावतो.

पर्यावरणातील संतुलन राखण्यासाठी अशा प्रजातींचे अस्तित्व अत्यावश्यक आहे.बाळापुरे लेआउटमध्ये आढळलेल्या या सापाला कोणतीही इजा न करता सुरक्षितपणे पकडून पुन्हा त्याच्या नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले. या कार्यात सर्पमैत्रीण संघटना पाटील, ठकसेन इंगोले, रूपेश खंडारे, शुभम विघे व अभिजीत दानी यांनी मोलाचे सहकार्य केले.

# वन विभागाला बिबट्या पावला; ५६० कोटींचे पॅकेज; १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्यात येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

राज्यात सध्या २९ जिल्ह्यांमध्ये बिबट्याने उच्छाद मांडला असून त्याच्या हल्ल्यात अनेकांचे प्राण गेले आहेत. बिबटे व मानव संघर्ष रोखण्यासाठी वन विभागाला ५६० कोटींचा निधी देण्याची घोषणा करण्यात आली आहे. याशिवाय पुणे, अहिल्यानगर आणि नाशिक जिल्ह्यात १८०० बिबटे ठेवण्यासाठी जंगलात रेस्क्यू सेंटर उभारण्यात येणार आहेत.



**बिबटे व मानव संघर्ष आता नैसर्गिक आपत्ती ठरणार**

महाराष्ट्रात चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, नाशिक, अहिल्यानगर, बुलढाणा, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली या जिल्ह्यांमध्ये बिबटे आता मानवी वस्त्यांमध्ये शिरत असल्याने शासन अस्वस्थ झाले आहे. बिबट्यांचे वाढते हल्ले विचारात घेता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये वरिष्ठ वनाधिकारी, सचिव, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक, वित्त सचिव, महाव्यवस्थापक विद्युत वितरण यांच्या समवेत बैठक घेतली. त्यांनी परिस्थिती हाताळण्याचे निर्देश दिले.

बिबट्याला वन्यप्राणी अनुसूची १ मधून २ मध्ये टाकण्यासाठी केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याचे ठरले. डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी योजनेतून बिबट प्रवण क्षेत्रातील घरे, गोठे, शाळा, दवाखाने आदी भोवताली सौर ऊर्जा कुंपण उभारण्यात येणार आहे.

मानवावर हल्ले करणाऱ्या बिबट्यांना नरभक्षक ठरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत ५ डिसेंबर २०२५ रोजी विशेष कार्य अधिकारी उदय ढगे यांनी पत्राद्वारे कळविले आहे. नाशिक, अहिल्यानगर आणि पुणे या तीन जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी ६०० बिबटे बंदिस्त करण्यासाठी तत्काळ रेस्क्यू सेंटर उभारण्यात येणार आहे.

वन विभागाच्या जागेवर वनक्षेत्रात तीन जिल्ह्यांमध्ये १८०० बिबटे ठेवण्याची सोय केली जाणार आहे.वेळ पडल्यास रेस्क्यू सेंटरची संख्या अन्य जिल्ह्यांमध्ये वाढवली जाणार आहे.

याशिवाय रॅपीड रेस्क्यू युनिटच्या संख्येत वाढ केली जाणार आहे. त्यामुळे वन विभागात प्रथमच रॅपीड युनिटची स्थापना केली जाणार आहे.बिबटे आणि मानव संघर्ष वाढल्याने मानव हानी व पशुधन, शेतातील पिकांचे नुकसान होत असल्याने मुख्यमंत्र्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयास अधीन राहून मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना 'नैसर्गिक आपत्ती' म्हणून घोषित करण्याचे निर्देश दिले आहेत.

वाढते बिबट हल्ले लक्षात घेता 'राज्य नैसर्गिक आपत्ती' घोषित करण्यासंदर्भात वन व मदत पुनर्वसन विभागाला अभिप्राय देण्याचेही निर्देश दिले आहेत.

# अधिवेशनाच्या वर्दळीत चर्चा एका अधिकाऱ्याच्या टेबलवरील 'नेमप्लेट'ची

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नागपूर**



नागपुरात सध्या विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन आहे. संपूर्ण सरकार यानिमित्ताने नागपुरात दाखल झाले आहे, मुख्यमंत्री, त्यांचे सहकारी मंत्री, आमदाराच नव्हे तर राज्याच्या मुख्य सचिवांपासून इतरही सर्व प्रमुख वरिष्ठ अधिकारी नागपुरात आले आहेत. अधिवेशन हे जसे राज्यातील विविध समस्यांवर चर्चा करण्यासाठी भरवले जाते, पते गाजते अधिक मंत्री, अधिकारी यांची बडदास्त ठेवण्यासाठी होणाऱ्या कोट्यवधी रुपयाच्या खर्चामुळे. यात होणाऱ्या भ्रष्टाचारमुळे. त्यामुळेच नेहमीच असे अधिवेशन व्हावे, अशी इच्छा ही सर्व यंत्रणा सांभाळणाऱ्यांची असते. मात्र या अशा सडक्या व्यवस्थेतही काही आशेचे किरण शिल्लक आहेत, ज्यांचे त्यांच्या सरकारी पगारातच भागते.

विशेष म्हणजे या भ्रष्टव्यवस्थेचा आपण भाग होऊ नये, असे त्यांना सांगावे लागत. त्यासाठी धाडस लागते, हे धाडस नागपूरच्या एका अधिकाऱ्याने दाखवले. त्यांनी आपल्या कक्षात टेबलवरील ' मी माझ्या पगारावर समाधानी आहे' अशी सूचना वजा नेमप्लेटच लावली. सध्या नागपुरात चर्चा आहे ते याच नेमप्लेटची. राजेश खवले असे या अधिकाऱ्याचे नाव.

नागपूरच्या विभागीय आयुक्त कार्यालयात खवले हे अतिरिक्त आयुक्त (महसूल) आहेत. इंग्रजकालीन इमारतीत असलेल्या नागपूरच्या विभागीय आयुक्त कार्यालयात आयुक्तांनंतर दुसऱ्या क्रमाकांचे हे पद. त्यांचे दालनही विभागीय आयुक्तांच्या दालनाच्या दुसऱ्या बाजूने. विविध सरकारी प्रकल्पांसाठी अधिग्रहित करण्यात आलेल्या जमिनीच्या आक्षेपांवरील सुनावण्या साधारपणे अतिरिक्त आयुक्तांकडे असतात. त्यावरून या पदाचे महत्व लक्षात यावे. या पदावर अनेक वर्ष काम करणाऱ्या पूर्वसरींचे अनेक किस्से आजही रंगवून सांगितले जाते. त्यामुळे अतिरिक्त आयुक्त म्हंटले की लोकांच्या मनात 'वेगळे' विचार येतात.

सरकारी काम आणि सहा महिने थांब आणि काम अविलंब करायचे असेल तर अधिकाऱ्यांचे खिसे गरम करणे आलेच. पण खवले त्यातले नाहीत. आपल्याबाबतही लोकांनी इतरांप्रमाणेच समज करून घेऊ नये म्हणून त्यांनी त्यांच्या कक्षातच एका टेबलवर नेमप्लेट वजा फलक लावला आहे व त्यावर लिहिले आहे मी माझ्या पगारावर समाधानी आहे'. याचा अर्थ मला लाच देण्याचा प्रयत्न कोणी करू नये, लाच घेणे अलीकडच्या काळात फारच सहज झाले आहे, पण मला लाच नको म्हणण्यासाठी धाडस लागते 'अग अग म्हशी मला कुठे नेशी ' म्हणनारे असतात. पण ते कधी जाहीरपणे असा सूचना फलक लावण्याची हिंमत करीत नाही. खवले यांनी ही हिंमत दाखवली म्हणूनच ते व त्यांची नेमप्लेट सध्या प्रशासकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरली आहे.

# युवा स्वाभिमान पक्षाच्या उमेदवारी अर्जासाठी इच्छुकांची मोठी गर्दी

## आ. रवि राणा यांच्या नेतृत्वावर जनतेचा विश्वास दृढ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

आगामी अमरावती महानगरपालिका निवडणूक २०२५-२६ च्या तोंडावर शहरातील राजकीय वातावरण तापू लागले असून युवा स्वाभिमान पक्षाकडे उमेदवारी अर्जासाठी इच्छुकांची मोठी गर्दी उसळली आहे. पक्षाच्या कार्यालयात गेल्या काही दिवसांपासून महिला, पुरुष तसेच उत्साही युवक-युवतींचा अर्ज उचलण्याचा ओघ प्रचंड वाढला आहे.

पक्षाचे संस्थापक आ. रवि राणा यांच्या नेतृत्वावर असलेला विश्वास, त्यांच्या पुढाकारातून पूर्ण झालेली विकासकामे आणि पक्षाचा 'विकास व पारदर्शक प्रशासन' हा स्पष्ट अजेंडा पाहता यंदा अनेक सामाजिक कार्यकर्ते, व्यावसायिक, सेवाभावी व्यक्ती, शिक्षित तरुण व महिला सक्रिय राजकारणात उतरू इच्छित आहेत. त्यामुळे सर्व प्रभागांमध्ये युवा स्वाभिमान पक्षाला मिळणारा प्रतिसाद दिवसेंदिवस वाढत असून उमेदवारीसाठीची स्पर्धा चांगलीच रंगू लागली आहे.अनेक इच्छुक उमेदवारांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांत शहरातील रस्ते, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण, क्रीडा सुविधा यासह विविध पायाभूत सुविधांच्या विकासामुळे त्यांना पक्षातून उमेदवारी घेण्याची प्रेरणा मिळाली.प्रभाग क्र. २२ ते प्रभाग क्र. ०१ पर्यंत-अजय जयस्वाल, सौ. विजया घोडेस्वार, नाना आमले, श्रीमती सुमती ढोके, चैताली तुषार दुधे, सचिन भेंडे, वैशाली ढेपे, पंकज बांगडे, सुरज मिश्रा, प्रीती रेवणे, नितीन बोरेकर, डॉ. मधुरा काहाळे, माजी नगरसेवक आशिषकुमार गावंडे, पद्मा पुरी, पंकज सुरडकर, मयुरी कावरे, अजय उर्फ लाला तिवारी यांसह अनेकांनी उमेदवारी अर्ज उचलल्यामुळे पक्ष कार्यालयात उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे.

मनपा निवडणुकीच्या वाऱ्या सुरू होताच सर्वच पक्षांच्या हालचालींना वेग आला असला, तरी युवा स्वाभिमान पक्षाकडे उमेदवारांची दिसणारी लाट आगामी निवडणुकीत पक्षाची ताकद अधिक दृढ करेल, अशी चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे. शहरातील वाढती उत्सुकता आणि युवा स्वाभिमान पक्षाला मिळणारा जनसमर्थनाचा प्रतिसाद हीच सध्या अमरावतीतील मुख्य राजकीय चर्चा बनली आहे.

# सोयाबीनला नाही भाव, सत्तेसाठी महायुतीची धावाधाव

## कापसाची माळ घालून विरोधक विधानभवनाच्या पायरीवर शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विरोधक आक्रमक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ नागपूर**

अधिवेशनातील दुसऱ्या दिवशी विरोधक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आक्रमक झाले. त्यांनी विधानभवनाच्या पायरीवर कापसाच्या माळा गळ्यात घालून सरकार विरोधात घोषणाबाजी केली.

विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विरोधकांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरले. कर्जमाफी, कापूस-सोयाबीनला भाव मिळावा अशी मागणी करत त्यांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर जोरदार घोषणाबाजी केली. यावेळी त्यांनी हे फडणवीस नव्हे तर फसणवीस सरकार आहे, असा आरोप लगावला.

'सोयाबीनला नाही भाव, सत्तेसाठी महायुतीची धावाधाव','सोयाबीनला नाही भाव, फडणवीस म्हणतात तुलाच ठाव','कर्जबाजारी शेतकऱ्याला तर देतंच नाय, पॅकेज फडणवीसांचं फसवंच असतंय', 'अर्थमंत्र्यांच्या खिशात पैसाच नसतोय, पॅकेज फडणवीसांचं फसवंच असतंय' आदी बॅनर हातात घेऊन विरोधकांनी विधानभवनाच्या पायऱ्यांकडे कुच केले. यावेळी 'शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळालीच पाहिजे', 'कापूस-सोयाबीनला भाव मिळाला पाहीजे', आदी मागण्या करण्यात आल्या.गळ्यात कापसाच्या बोंडाच्या माळा घालून विरोधकांनी 'सरकार तुपाशी, शेतकरी उपाशी' अशा घोषणादेखील दिल्यात. यावेळी कॉंग्रेसचे ज्येष्ठ आमदार विजय वडेट्टीवार, राष्ट्रवादी कॉंग्रेस शपचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे, शिवसेना उबाठाचे युवा नेते आदित्य ठाकरे, भास्कर जाधव, सुनील प्रभू, सचिन अहिर, वरुण सरदेसाई, सिद्धार्थ खरात, प्रवीण स्वामी, कॉंग्रेसचे सतेज पाटील, अस्लम शेख आदींची उपस्थिती होती.

# विविध प्रकारच्या मागण्या घेऊन आंबेडकरवादी पार्टी धडकणार नागपूर अधिवेशनावर

## शेतकरी, मजूर, तरुण व बौद्ध समाजाच्या विविध मागण्यांसाठी आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९तिवसा**



आंबेडकरवादी रिपब्लिकन पार्टीच्या वतीने शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी मुंबई येथील विधानभवनावर भव्य धडक मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. शेतकरी, मजूर, सुशिक्षित बेरोजगार तरुण, बौद्ध समाज तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या ज्वलंत प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे.या धडक मोर्चामध्ये पक्षाच्या वतीने विविध महत्त्वाच्या आणि जनहिताच्या मागण्या शासनासमोर मांडण्यात येणार आहेत. यामध्ये प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे आहे शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी देण्यात यावी.शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यात यावा, जेणेकरून बिबट्या व वन्यप्राण्यांची भीती कमी होईल स्वतंत्र विदर्भ राज्याची निर्मिती करण्यात यावी.शेतमालास योग्य व हमीभाव देण्यात यावा.भूमिहीन शेतकऱ्यांनी वाहिलेल्या ई-क्लास जमिनींना सात-बारा देण्यात यावा महाबोधी विहार मुक्त करून तो बौद्ध बांधवांच्या ताब्यात देण्यात यावा.जातीनिहाय जनगणना तात्काळ राबविण्यात यावी.लाडकी बहीण योजनेच्या भत्त्यात वाढ करण्यात यावी सुशिक्षित बेरोजगार तरुणांना बेरोजगारी भत्ता लागू करण्यात यावा अशा अनेक प्रकारचे मागणी पक्षा कडून निवेदनाद्वारे केली जाणार आहे करिता या धडक मोर्चाचे नेतृत्व रघुनाथ शेळके (राष्ट्रीय अध्यक्ष), मो. शफी सौदागर (महाराष्ट्र अध्यक्ष), ड. चंद्रशेखर देवताळे (राष्ट्रीय नेते), सुरेशचंद्र कांबळे (महाराष्ट्र सचिव), राजू गाडगे (राष्ट्रीय महासचिव) व सुरज लांडगे (केंद्रीय महासचिव) हे करणार आहेत.या मोर्चात राज्यभरातून मोठ्या संख्येने कार्यकर्ते, शेतकरी, तरुण व बौद्ध बांधव सहभागी होणार असल्याने आंदोलनाकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले आहे. शासनाने या मागण्यांचा तात्काळ गांभीर्याने विचार करून निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही पक्षाच्या वतीने देण्यात आला आहे.

# ब्रिजलाल बियाणी महाविद्यालयातील नव्या ऑडिटोरियमला भीषण आग;अग्निशामक दलाच्या तत्परतेने मोठी दुर्घटना टळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**



अमरावती शहरातील नामांकित ब्रिजलाल बियाणी महाविद्यालयाच्या परिसरात बांधकामाधीन असलेल्या नवीन ऑडिटोरियम हॉलमध्ये आज, मंगळवारी अचानक भीषण आग लागून मोठे आर्थिक नुकसान झाले. काही दिवसांत हॉलचे उद्घाटन होणार असतानाच ही घटना घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली.

आगीची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशामक दलाच्या तीन गाड्या काही मिनिटांत घटनास्थळी दाखल झाल्या. दलाच्या तत्पर हस्तक्षेपामुळे आग वाढण्यापूर्वीच नियंत्रणात आणण्यात यश मिळाले. या आगीत हॉलच्या वरच्या मजल्यावरील सिलिंग, छताचा मोठा भाग आणि आतील साहित्य जळून खाक झाले असून प्राथमिक अंदाजानुसार लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून शॉर्ट सर्किटची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. महाविद्यालय प्रशासन आणि पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे.

# मेळघाटात व्यसनामुळे वाढतोय कॅन्सर; युवा ते प्रौढ व्यक्तींमध्ये रक्ताल्पता : संशोधन चमू काढणार निष्कर्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९मेळघाट**



मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यू यांच्या कारणांची मीमांसा करण्यासाठी आलेल्या मंत्रालयातील विविध विभागांच्या सचिवांपुढे युवा ते प्रौढ व्यक्तींमध्ये मोठ्या प्रमाणात रक्ताची कमतरता असल्याचा मुद्दाही समोर आला.

मेळघाटाच्या स्थितीबाबत न्यायालयात याचिका दाखल करणारे पद्मश्री डॉ. रवींद्र कोल्हे यांनी हा मुद्दा या दौऱ्यात प्रामुख्याने मांडला. त्यासाठी आयसीएमआर (इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च - भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद) ला कळविले जाणार असल्याचे आरोग्य सचिव डॉ. निपुण विनायक यांनी 'लोकमत'शी बोलताना सांगितले. बालवयापासूनच तंबाखू, गुटखा, दारूचे व्यसन जडल्याने कर्करोगाचे प्रमाणसुद्धा येथे वाढत असल्याचे पुढे आले.बालमृत्यू, मातामृत्यू, कुपोषण यांबाबत विविध कारणे पुढे आली. प्रामुख्याने युवा ते प्रौढ व्यक्तींमध्ये रक्ताल्पता आढळून आली. आयसीएमआरला कळवून या मुद्द्यावर संशोधन केले जाणार आहे. मेळघाटात बालवयापासून जडणाऱ्या व्यसनांसाठी आता प्रकर्षाने जनजागृती करून आदिवासींच्या आरोग्यावर विशेष लक्ष दिले जाईल, असे सचिव निपुण विनायक यांनी सांगितले.

**कार्यकर्त्यांशी चर्चा**

धारणी व चिखलदरा तालुक्यांतील अंगणवाडी केंद्रे, आरोग्य केंद्रे, उपकेंद्रांना भेटी दिल्या. फ्रंटलाइनवरील डॉक्टर, परिचारिका कर्मचाऱ्यांशी चर्चा केली. धारणी येथे सामाजिक कार्यकर्त्यांनासुद्धा बोलण्याची संधी देत समस्या ऐकून घेतल्या.

# शहराच्या मध्यभागी असलेल्या मोसीकॉल ची पूर्ण जागा विक्री न करता किमान १० एकर जागा आरक्षित करून सुसज्ज बाजाराचे निर्माण करावे : डॉ. सुनील देशमुख

## शहरातील पुरातन इतवारा व शुक्रवारी बाजार अपुरे असल्याने शहरात नव्या बाजाराची व्यवस्था करणे नितांत गरजेचे

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

अमरावती शहरातील चौधरी चौक ते विलास नगर रोडवर डाव्या बाजूला असलेल्या मध्यवस्तीत विलास नगर लगत कॉटन मार्केट रोड वरील महाराष्ट्र शासनाचा उपक्रम असलेल्या महाराष्ट्र राज्य तेलबिया, व्यापार व औद्योगिक महामंडळ ची अंदाजे २२ ते २४ एकर विस्तीर्ण जागा उपलब्ध असून महामंडळ आता या जागेची जसे आहे तसे, जिथे आहे तिथे, जे काही आहे ते आणि कोणताही परतावा/ दावा नाही या तत्त्वावर विक्री करणार असल्याची निविदा नुकतीच प्रकाशित करण्यात आलेली आहे. अमरावती शहरांमध्ये गेल्या ७०- ८० वर्षांपासून इतवारा बाजार व शुक्रवारी बाजार असे दोनच पारंपारिक बाजाराच्या जागा निश्चित करण्यात आलेले आहेत. इतक्या वर्षात अमरावती शहराचा कैक पटीने वाढलेला विस्तीर्ण व्याप व लोकसंख्या याकरिता हे दोन्ही बाजार अत्यंत प्रचंड गजबजलेले व अपुरे असून सार्वजनिक वापराच्या नवीन बाजाराची अत्यंत निकड जाणवत आहे हे सर्वश्रुत आहे. असे असताना शासनाचा उपक्रम असलेल्या महामंडळाच्या मालकीची ही जागा पूर्णतः विक्री न करता यातील किमान १० एकर जागा महानगरपालिकेद्वारे विकास योजनेमध्ये आरक्षित करून चौधरी चौक,कॉटन मार्केट विलास नगर रोड, गाडगेनगर या रस्त्यावरील अनधिकृत भाजीपाला विक्रेते व अन्य हॉकर्स यांची येथे नव्याने सुसज्ज बाजाराचे निर्माण करून अमरावती शहरात रस्तोरस्ती बोकाळलेल्या अनधिकृत हॉकर्स ची गर्दी कमी करून वाहतूक व्यवस्था सुधारण्याची सुद्धा ही नामी संधी आहे. परंतु लोकप्रतिनिधी शहराच्या विकासाची बुज राखून या दिशेने प्रयत्न करणार काय हा खरा सवाल आहे. नव्हे तर हे त्यांचे जनते प्रती असलेले उत्तरदायित्वच आहे. पण त्यांचे प्राधान्यक्रम वेगळेच असल्याने ते त्यातच मश्गूल असल्याचे चित्र आहे.



एकेकाळी अमरावती शहराच्या मध्यवस्तीतील हा भाग येथे असलेल्या कापूस प्रक्रिया, जिनिंग प्रेसिंग इत्यादी उद्योगामुळे भरभराटीला आलेला होता येथे मोसीकॉल, शेतकरी सहकारी जिनिंग प्रेसिंग संस्था, तिवसा जीनिंग फॅक्टरी, एदलजी फ्रॉमजी दोटीवाला जिनिंग फॅक्टरी, नेमानि जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी, लड्ढा जिनिंग या उद्योगामुळे कापूस प्रक्रिया क्षेत्रात सुवर्णकाळ गाजवलेला परिसर आहे. परंतु कालौघात हे उद्योग डबघाईस घेऊन बहुतांश उद्योग आता बंद पडले आहे. मागे शेतकरी सहकारी जिनिंग प्रेसिंग फॅक्टरी च्या जागेचे सुद्धा असेच व्यावसायिकरण करून ही संपूर्ण जागा अनेक बांधकाम क्षेत्रातील व्यावसायिकांच्या घशात घालून आपले उखळ पांढरे करून घेतल्याची उदाहरणे आहेत. आता अंदाजे २५ एकराचा हा मोठा भूखंड जो की शासनाचा अंगीकृत उपक्रम असलेल्या महामंडळाच्या मालकीचा असून तो आता विक्री करून तेथे व्यावसायिक स्वरूपाचे बांधकाम करण्याचे प्रयोजन असल्याचे निश्चित झालेले आहे. दिसली जागा की त्याची विक्री करायची किंवा त्याचा आपल्या व्यापारी मित्रमंडळींना विक्री करून व्यावसायिक लाभ मिळवून द्यायचा याची जणू शहरात लोकप्रतिनिधींमध्ये स्पर्धा लागल्याचे चित्र अमरावतीकर जनता ताज्या नेहरू मैदान येथे प्रस्तावित व्यापारी संकुल व अन्य सरकारी जागा व्यावसायिकांच्या घशात घालण्याच्या प्रयत्न होत असल्याचे अमरावतीकर अनुभवत आहेत.

महामंडळाची पर्यायाने शासनाच्या मालकीची जागाच काय तेवढी तिथे त्याच्या अस्तित्वाच्या वैभवाच्या शेवटच्या घटका मोजत आहे.अमरावती शहरांमध्ये दहा लाख लोकसंख्येला अस्तित्वातील इतवारा व शुक्रवारी बाजार अपुरे या दोन्ही बाजाराच्या मध्ये चौधरी चौक ते विलास नगर रोडवर डाव्या बाजूला एक तिसरा नवीन बाजार वसवल्याने अमरावती शहराच्या रस्तोरस्ती भाजीपाला विक्रेते व अन्य जीवन आवश्यक वस्तू विक्री करणारे अनधिकृत होकर्सचा मोठा सुळसुळाट निश्चितच कमी होणार आहे.. यामुळे वाहतूक अनियंत्रित व विस्कळीत होऊन जीव घेणे अपघात झाल्याच्या घटना सुद्धा घडलेल्या आहे. या पार्श्वभूमीवर या उपलब्ध शासकीय जागेपैकी शासन स्तरावर प्रयत्न करून यातील आवश्यक जागा बाजाराकरिता आरक्षित करून नव्याने बाजार निर्माण करायची कार्यवाही अमरावती महानगरपालिकेने सुरू करावी. तसे पाहता हे कार्य निर्वाचित लोकप्रतिनिधींनी करणे अत्यंत गरजेचे आहे. केवळ व्यावसायिक संकुले,निवासी संकुले बांधकाम करणे हाच केवळ विकास असू शकत नाही तर वाढत्या लोकसंख्येला आवश्यक असणाऱ्या दैनंदिन जीवनात लागणाऱ्या गरजांची पूर्तता करणे तितकेच महत्त्वाचे आहे. या निमित्ताने एक नवीन बाजाराची जागा निश्चित करून विकसित करण्याची नामी संधी या निमित्ताने लोकप्रतिनिधी व महानगरपालिका यांचे पुढे चालून आलेली आहे. याचा अग्रक्रमाने विचार करून तेथे नवीन बाजार निर्माण करण्याची मागणी माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख अमरावती महानगरपालिकेला केली आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत